
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ

स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५



# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष सत्ताविसावे/अंक ६/जून २०२६

## संपादकीय

### संकेतस्थळ निर्मात्याचे स्मरण

माहिती क्रांतीने आपल्याला अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यातील एक आहे 'वैश्विक माहितीचे महाजाल' याला इंग्रजीत 'वर्ल्ड वाइड वेब' (World Wide Web) असे म्हणतात आणि त्याचा संक्षिप्तरूपात www असा उल्लेख करतात. या प्रणालीत वेगवेगळ्या संस्था, व्यक्ती, घटना यांची माहिती देणारी संकेतस्थळे (Websites) निर्माण करण्यात आलेली आहेत. या संकेतस्थळांना भेट देऊन आपल्याला हवी असलेली माहिती लगेच मिळविता येते. यासाठी संकेतस्थळांचा युनिव्हर्सल रिसोर्स लोकेशन (Universal Resource Location म्हणजे URL) आपल्याला माहीत असणे आवश्यक असते. तो लिहिला की आपण त्या संकेतस्थळाला जोडले जातो.

संकेतस्थळाशी जोडणी करण्यासाठी एक विशिष्ट संगणकीय भाषा वापरली जाते. तिला 'हायपर टेक्ट ट्रान्सफर प्रोटोकॉल' (Hypertext Transfer Protocol), थोडक्यात 'http' असे म्हणतात. संकेतस्थळाला भेट देण्यासाठी http असे आधी लिहावे लागते. त्यानंतर www ही तीन अक्षरे लिहावी लागतात. शेवटी प्रत्यक्ष संकेतस्थळाचा पत्ता लिहावा लागतो. समजा तुम्हाला विद्या प्रसारक मंडळाच्या संकेतस्थळावर असलेली माहिती पाहायची आहे. त्यासाठी तुम्हाला http://www.vpmthane.org असा युआरएल पत्ता लिहावा लागेल.

युआरएल पत्ता ठरविताना काही नियम पाळावे लागतात. त्यात संस्थेचे नाव तर द्यावेच लागते त्याचबरोबर ही संस्था कोणत्या प्रकारात मोडते हे देखील सांगावे लागते. वरच्या पत्त्यातील org हा पत्ता एका संस्थेचा असल्याचे सूचित करते. टाटा मूलभूत संशोधन संस्थेचा युआरएल http://www.tifr.res.in. यामध्ये ही संशोधन संस्था असून, ती भारतात आहे असा उल्लेख केला आहे. भारतातील विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्थांसाठी निर्माण केलेल्या संकेतस्थळाचा शेवट ac.in असा असतो. उदाहरणार्थ, मुंबईच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थेचे संकेतस्थळ http://www.iitb.ac.in असे आहे; तर मुंबई विद्यापीठाचे संकेतस्थळ http://www.mu.ac.in असे आहे. अमेरिकन शैक्षणिक संस्थांसाठी edu एवढाच उल्लेख केला तरी चालतो. देशाचे नाव देण्याची गरज नाही. जसे हार्वर्ड विद्यापीठाचे संकेतस्थळ http://www.harvard.edu असे आहे. एखादी व्यापारी संस्था असेल तर तिच्या संकेतस्थळाचा शेवट com ने होतो. जसे रिलायन्स कंपनीच्या संकेतस्थळाचा पत्ता http://www.reliance.com असा आहे.

(मुखपृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)


वेगवेगळ्या प्रकारची माहिती मिळविण्यासाठी आपण संकेतस्थळाचा नेहमीच वापर करतो. हे काम आता एवढे सोपे झाले आहे की, आता http किंवा www हे देखील टाईप करण्याची गरज नाही. केवळ google एवढे टाईप केले तरी गुगलच्या संकेतस्थळाला आपण जोडले जातो. मागील काही वर्षांच्या प्रगतीने संकेतस्थळांना भेट देण्याची देखील आवश्यकता राहिलेली नाही. चॅटजीपीटी (Chatgpt) किंवा परप्लेक्सिटीला (Perplexity) ला प्रश्न विचारून पाहिजे ती माहिती मिळविता येते. वेगवेगळ्या संकेतस्थळांना भेट देऊन आवश्यक ती माहिती घेण्याचे काम चॅटजीपीटी किंवा परप्लेक्सिटी करते. आजकाल याच सुविधांचा जास्त वापर होताना दिसतो.

''अति परिचयात अवज्ञा'' अशी मराठीत म्हण आहे. आपण संकेतस्थळाचा नियमितपणे वापर करतो. परंतु त्याची निर्मिती कोणी, कधी आणि कुठे केली याची माहिती फारजणांना नसते. संकेतस्थळ निर्मिती हे एक माहिती क्रांतीमधील एक महत्त्वाचे पाऊल आहे. त्यामुळे ज्या व्यक्तीनी हे कार्य केले त्या व्यक्तीबद्दल मला नित्तांत आदर आहे. विशेष हे की, ती व्यक्ती अजून जीवंत आहे. जून महिना उजाडला की मला त्यांचे स्मरण होते. सर टिम बर्नर्स ली (Tim Berners Lee) असे त्यांचे नाव असून, ८ जूनला त्यांचा वाढदिवस असतो. ८ जून १९५५ रोजी लंडन शहरात टिमचा जन्म झाला. त्यांचे नाव टिमोथी (Timothy) असे आहे. परंतु त्यांना लोक 'टिम' या नावानेच ओळखतात. काही जण तर त्यांना 'टिमबीएल' (TimBL) या संक्षिप्त नावाने संबोधतात.

टिम हा लहानपणापासूनच जरा खोडकर वृत्तीचा मुलगा होता. कोणतीही वस्तू हातात आली की ती उघडून पाहण्याची त्याची वृत्ती होती. लंडन आणि केंब्रिज या शहरातून शिक्षण घेऊन टिम जिनिव्हा येथील सर्न या संस्थेत रुजू झाले. सर्न (CERN) ही युरोपीय देशांच्या सहकार्याने सुरू केलेली आण्विक संशोधन संस्था असून, तिचे मुख्यालय जिनिव्हा येथे आहे. या संस्थेत काम करीत असताना माहितीची सहजपणे देवाणघेवाण कशी करता येईल यावर ते विचार करू लागले. त्यातून त्यांना संकेतस्थळाची कल्पना सुचली. आपली कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी वेगळी प्रणाली विकसित केली. त्याला हायपरटेक्स्ट ट्रान्सफर प्रोटोकॉल (Hypertext Transfer Protocol) असे म्हणतात. त्याचा संक्षिप्तरूपात http असा उल्लेख करतात. या प्रणालीचा वापर करून सर्न संस्थेचे http://www.cern.ch असे संकेतथळ निर्माण केले. सर्न प्रयोगशाळेत काम करणाऱ्या संशोधकांना आधी त्यांनी संकेतस्थळाचे महत्त्व पटवून दिले. या संस्थेत संकेतस्थळाचा वापर सुरू झाल्यानंतर त्याचे महत्त्व लोकांना पटले. लवकरच या यंत्रणेचा जगभर वापर सुरू झाला. विशेष हे की ही सुविधा वापरण्यासाठी कसलेही शुल्क द्यावे लागत नाही. सर टिम बर्नर्स ली यांनी त्यांच्या या नवीन कल्पनेने स्वामित्व हक्क देखील घेतले नाहीत. माझे संशोधन मी जगाला मोफत उपलब्ध करून देतो असे मोठ्या मनाने त्यांनी जाहीर केले. म्हणूनच ते कौतुकास पात्र आहेत. अशा दिलदार व्यक्तींनीच आपले जीवन सुखकर केले आहे. त्यांनी वर्ल्ड वाइड वेब कंसोर्टियम (World Wide Web Consortium) नावाची संघटना स्थापन केली आणि त्यात स्वतःला झोकून दिले. आजच्या घडीला ते इंग्लंडमधील ऑक्सफर्ड विद्यापीठात रिसर्च फेलो (Research Fellow) आणि अमेरिकेच्या मॅसॅच्युसेट इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (Massachusetts Institute of Technology) मध्ये मानद प्राध्यापक (Emeritus Professor) म्हणून कार्यरत आहेत. टिम बर्नर्स ली यांचे जीवन शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असेच आहे असे मला वाटते.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

•••




**वर्ष सत्ताविसावे/अंक ६/जून २०२६**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ३० वे/अंक १२ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**
**vpmt1935@gmail.com**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : ९१५२४८७७६५**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | जागतिक वारसा स्थळ : नामांकित गड किल्ल्यांचा परिचय किल्ले सिंधुदुर्ग | दिलीप नारायण वंडलकर | २ |
| ३) | मन आणि आरोग्य | प्रा. डॉ. अशोक पाटील | ७ |
| ४) | चित्रकार गोपाळ देऊसकर : कलावंत आणि माणूस | चन्द्रशेखर टिळक | ९ |
| ५) | कायद्याच्या अभ्यासात 'भारतीय मुळां'ची आवश्यकता | डॉ. प्रशांत धर्माधिकारी | १४ |
| ६) | कालजयी दिनकर | अजिंक्य कुलकर्णी | १६ |
| ७) | ओळख पुस्तकाची | श्री. विजय जोशी | १९ |
| ८) | शिवचरित्र आणि स्व. गजानन भास्कर मेहेंदळे | डॉ. केदार फाळके | २१ |
| ९) | रत्नाकर मतकरींच्या कथा 'जौळ' आणि 'इन्व्हेस्टमेंट!' | हेरंब ओक | २५ |
| १०) | मी अनुभवलेले विज्ञान भारतीचे ७ वे अधिवेशन, वाराणशी | नीतिन ओक | २८ |
| ११) | परिसर वार्ता | संकलित | ३५ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# जागतिक वारसा स्थळ नामांकित गड किल्ल्यांचा परिचय
# किल्ले सिंधुदुर्ग

*सह्याद्रीतील डोंगरी किल्ल्यांवर आपली मांड पक्की केल्यावर शिवबाराजेंनी जाणीवपूर्वक आपले लक्ष कोंकण किनारपट्टीवर वळवले. महाराष्ट्राला लाभलेल्या सुमारे पाचशे मैल सागरी किनाऱ्याचा लाभ घेणे जरुरीचे होते. अशातच त्यांचे कोंकणातील 'मालवण' या गावी येणे झाले असता समोरच्या 'कुरटे बेटाकडे' लक्ष गेले. प्राथमिक निरीक्षणात बेटावर पिण्याच्या पाण्याची मुबलकता आणि गडबांधणीस लागणाऱ्या काळ्या दगडांची विपुलता आढळून आल्याने राजांनी या जागी दुर्ग बांधणीचा निश्चय केला. त्यातूनच आजच्या सिंधुदुर्गाची निर्मिती झाली. त्याचीच माहिती व पूर्वेतिहास या लेखात दिलेला आहे. - संपादक*



**सिंधुदुर्ग आणि बाजूचा संरक्षक पद्मगड**

काळ सुसाट धावत होता १२ जुलै १६६० रोजी शिवबाराजे पन्हाळ्याहून निसटले. पण त्या आधी ५ मे १६६० रोजी-मुघल सरदार शाहिस्तेखान पुण्यातील शिवबाराजेंच्या लाल महालात डेरेदाखल झाला. २२ सप्टेंबर १६६० - विजापूर आणि दिल्ली या दोन्ही आघाड्यांवर लढणे अशक्य असल्याने राजांनी विजापूरशी तह केला. त्यामुळे त्या दिशेने शांतता लाभली. सतत तीन वर्षे मुघल सैन्याने स्वराज्याची नासाडी केली. त्यास शह म्हणून ५ एप्रिल १६६४ रोजी राजांनी लालमहाली छापा घालून शाहिस्तेखानाची तीन बोटे कापून त्यास शास्त दिली. ८ एप्रिल १६६४ - घाबरून शाहिस्तेखानाने बऱ्हाणपूरकडे प्रस्थान केले. २८ मे १६६४ मुघलांनी कोंढाण्याचा वेढा उठवला. ६ ते १० जून १६६४ स्वराज्याची झालेली हानी भरून काढण्यासाठी शिवबाराजेंनी सुरतेची लूट केली. त्यानंतरचे तीन महिने - नगर, बागलाण, विदर्भ, खानदेश या मोगलाई भागांत सातत्याने चढाया केल्या व त्यातून अगणित संपत्ती मिळवत प्रजेचे आणि सैन्याचे मनोधैर्य वाढवले. या आणि अशा आनंददायक वातावरणात शिवबाराजें कामगिरीवर असतांनाच एके दिवशी राजगडावरून तातडीचा खलिता आला. जिजाऊमांसाहेबांनी राजांना पत्र पाठविले होते. राजांनी ते उलगडले-सांप्रत पुन्हा दुर्बुद्धी धरून खवासखान विजापूरहून तुमच्यावर रवाना झाला आहे. त्याच्याबरोबर बाजी घोरपडे व खेमसावंत आहेत. बाजी घोरपडे याचा विसर पडू देऊ नये. ये समयी त्याचे वेठे घ्यावे आणि आमचे मनोदय शेवटास नेणारे तुम्ही सुपुत्र निर्माण आहा. म्हणोन आज्ञा केली.

राजांनी पत्र मस्तकी लावले आणि येसाजीला म्हणाले, 'आदिलशहाने तह मोडून आमच्यावर स्वारी आणली. खवासखान कोंकण चढून यायच्या आत त्याला गाठू.' एवढ्यात नजरबाजांनी बाजी मुधोळ मुक्कामीच असल्याची बातमी आणली. राजांनी लगेच उचल खाल्ली आणि रातोरात मुधोळ गाठण्याचा हुकूम जारी केला. दुसरा दिवस उजाडायच्या आतच राजांच्या फौजेने मुधोळ

घेरले आणि स्वत: राजे निवडक सेनेसह वाड्यात शिरले. सर्वत्र एकच कल्लोळ उडाला. शिवबांनी बाजीला ललकारले. बाजीने द्वंद्व खेळण्याचे आव्हान दिले. शिवबांनी ते सहर्ष स्वीकारले. बाजी निष्णात तलवारपटू होता. तलवारींच्या खणखणाटीने वाड्याचे चौक दुमदुमून गेला. दोघेही एकमेकांचे वार कधी ढालीवर, तर कधी सरळ तलवारीवर झेलत होते. अशातच वार करण्यासाठी बाजीने तलवार डोक्यावर उचलली ..पण, कसचे काय? शिवबांनी स्वत:भोवती गिरकी घेत थोडेसे खाली वाकत, डाव्या हाताची ढाल गळ्यासमोर ठेवत बाजीचा वार खाली यायच्या आत शिताफीने भवानीस बाजीच्या पोटातून आरपार केली. बाजी तुटलेल्या केळीसारखा धाडकन खाली आपटला अन् वाड्यात एकच स्मशान शांतता पसरली. मातोश्रींची इच्छा पूर्ण झाली. जिंजीच्या वेढ्यात पिताश्रींना ग्लानीच्या अवस्थेत हातकड्या बांधणाऱ्या बाजीचा त्याच्याच घरात घुसून मुडदा पाडला.. मुधोळ पडले.. पण राजे तिथेच थांबले नाहीत. लागलीच त्यांनी कुडाळकडे मोर्चा वळवला (आक्टोबर १६६४).

खवासखान घोरपड्यांची वाट बघत होता. घोरपड्यांवरचा हल्ला आणि त्याचा मृत्यू याची त्याला पुसटशीही खबर नव्हती. राजे एका रात्रीत कोंकणात उतरले. अवघड जागी तळ देऊन राहिलेल्या खवासखानाच्या सैन्याला चारी बाजूंनी वेढा दिला. भर रात्रीचा आलेला हल्ला पाहून खवासखानास कांही सुचेना. तरी त्याने आपल्या फौजेची जमवाजमव केली आणि प्रतिकार करू लागला. राजांच्या हल्ल्याला त्याने तारिफेने तोंड दिले, पण आडरानात सापडलेल्या खानाला मुकाबला करायला मैदान सापडत नव्हते. त्याचे दोन सरदार ठार झाले. तोच बातमी आली – 'शिवाजीने मुधोळ मारले, राजे बाजी घोरपडे मारले गेले.' त्या बातमीने धास्त खाऊन खवासखान माघार घेत घाटाकडे पळून गेला. माघार घेत असतांना राजांना पाठलाग करता आला नाही, असे त्याचे मोर्चे होते. राजांना चुटपुट लागून गेली. अशाही स्थितीत शिवबांनी त्याच्या युद्धनैपुण्याचे कौतुक केले.

कोंकण निर्धास्त झाले. थोडा विसावा म्हणून राजे मालवणला आले. जवळच्याच कांदळगावी राजांचा डेरा उभारण्यात आला. रात्रीच्या अल्प भोजनानंतर जगदंबच्या घोषात आडवे झाले. दिवस उजाडला. पहाटेच्या रम्य वातावरणात राजे समुद्रतीरावर उभे होते. सागर गर्जत किनाऱ्यावर झेपावत होता. दूरवर दिसणाऱ्या बेटाकडे अंगूली निर्देश करीत राजांनी बाजूलाच उभे असलेल्या तानाजी, मानाजींना त्या बेटाचा धांडोळा करून माहिती देण्यास सांगितले. तानाजी, मानाजी कामाला लागले. दोन-तीन स्थानिक कोळ्यांना घेऊन ते बेटावर फिरून दोन प्रहरी परतले. तानाजींनी हसऱ्या चेहऱ्याने वर्दी दिली, 'बेट नामी आहे. ते कुरटे म्हणून स्थानिक ओळखतात. कोस-दीड कोस फेऱ्याचं, काळ्या फत्तरांचं असून खडकावर गोड पाणी आहे.' राजे आनंदले. तात्काळ तानाजी, मानाजी, गंगाजी आणि मालवणातल्या वीस-पंचवीस कोळ्यांसह कुरट्यावर दाखल झाले. खडकाचे विशाल, भक्कम रूप पाहून राजांचा ऊर भरून आला. जमावाबरोबर राजे खडक फिरून आले आणि खडकावरचे पाणी पिऊन तृप्त झाले. राजांचे एक स्वप्न पूर्ण होत होते. राजे म्हणाले, तानाजी, आमच्या मनातलं एक शल्य आता दूर झालं. आम्ही आरमार उभं करण्याचा घाट घातला; पण त्या आरमाराला भक्कम जंजिरा नव्हता. महाडपासून गोकर्णपर्यंत आमची सुरक्षित समुद्रसपाटीपासून असूनही सिद्दीच्या गलबतांची भीती, फिरंग्यांची मिरास आम्हास बेचैन करत होती. आम्ही इथे जंजिरा बांधणार, आमची गलबतं इथं सुरक्षित राहतील. समुद्राची अनिर्बंध सत्ता स्वराज्याला लाभेल.

राजांनी कुरटे बेटाचा शोध लावणाऱ्या तानाजी, मानाजी, गंगाजी आणि सावजी कोळी यांना सोन्याचे

तोडे देऊन गौरविले आणि मालवणचा मुक्काम वाढवला. गावातील उपाध्याय जानभट अभ्यंकर यांनी शुभमुहूर्त काढून दिला आणि राजांनी किनाऱ्यावर थाटात गणेशपूजन आटोपले. हे स्थान आज मालवणच्या सागरकिनारी 'मोरयाचा धोंडा' म्हणून प्रसिद्ध आहे. इथे शिव, पार्वती, गणेश, चंद्र, सूर्य व नवग्रह लहान-मोठ्या खडकांच्या स्वरूपात दिसतात. त्यानंतर समुद्रपूजन करतांना त्यास वस्त्र, मंदिल, होन इत्यादी राजोपचार त्याला समर्पिले. राजांनी सोन्याचा नारळ सोडला आणि समुद्राने आपल्या लाटांच्या शुभ्र उत्तरीय वस्त्रात लगेच तो गुंडाळून घेतला. सागरवंदन करून राजे भूमिपूजनाच्या जागी म्हणजे कुरटे बेटावर आले. राजांनी संकल्प सोडला; मंत्रांच्या आवाजात जलदुर्गाच्या पायाचा प्रथम चिरा राजांनी स्वहस्ते बसविला. कुरटे बेटावर एकच आनंद उसळला. ही तारीख होती १५ नोव्हेंबर १६६४.

राजांनी तातडीने राजगडी दूत पाठवून बांधकाम अभियंता हिरोजी इंदूलकरांना बोलावून घेत गड बांधणीविषयी विस्तृत चर्चा केली. मुख्य दुर्गास संरक्षण म्हणून उपदुर्गांची निर्मिती, बुरूज कुठे आत तर कुठे बाहेर काढायचे ते समजावून सांगितले. आता कुरटे बेटावर काम जोरात सुरू झाले. राजांनी साऱ्या मुलुखातून पाचशे कुशल पाथरवट, दोनशे लोहार, शिवाय कामाठी, कोळी वगैरे तीन हजार हुन्नरी लोक बेटावर आणून ठेवले. बेटावर छपऱ्या उठल्या. गोव्याच्या फिरंग्यांनी त्यांचे तीनशे कुशल कामगार पाठवले. पाथरवट चिरे फोडत होते. लोहारडागात मुशी तयार झाल्या. शिशाचा रस पायात ओतून त्यात दगड बसविले जात होते. शिशांचा ढीग बेटावर पडू लागला. दुर्ग रक्षणार्थ पाचशे मावळ्यांचा खडा पहारा उभा होता. राजांची गलबते, तोफा, दारुगोळा मालवणाभोवती सज्ज झाला. या जलदुर्गाची खरी भीती होती सिद्दीला. त्याने व्यत्यय आणू नये म्हणून राजांनी सारी खबरदारी घेतली होती.

नेहमीप्रमाणे जगदंबच्या घोषात मग्न असतांना प्रत्यक्षात महादेवाने 'पुढील काम सुरळीत होईल' असा दृष्टांत दिला. दुसरे दिवशी पहाटेस कांदळगावातील रामेश्वरच्या पिंडाची प्रसन्नचित्ताने राजांनी पूजा बांधली आणि आठवण म्हणून वडाच्या झाडाचे वृक्षारोपण केले. हा वृक्ष आजही सुस्थितीत आहे. आता कोणत्याही आडकाठीविना दुर्ग बांधणीचे काम सुरू झाले. राजांनी दुर्गाच्या कामावर सुभेदार गोविंद विश्वनाथ प्रभूंची नेमणूक केली.

काळाची पाऊले पुढे पडत होती. शाहिस्तेखान परतला, पण लागलीच मिर्झाराजे जयसिंग आणि दिलेरखान यांच्या नेतृत्वात मोगली घाव स्वराज्यावर पडला. 'वाचेल तेवढे वाचवावे' या हेतूने शिवबाराजेंनी पुरंदर मुक्कामी मिर्झाराजेंशी तह केला. या तहान्वये तेवीस किल्ले मोगलांच्या ताब्यात द्यावे लागले आणि मन मारून मुघलांसोबत विजापूरच्या स्वारीत भाग घ्यावा लागला. पुढे आग्र्यास शहंशाह औरंगजेबाच्या पन्नासाव्या वाढदिवसानिमित्त भेट घेण्याचे ठरले. भेट झाली, पण राजे कैदेत सापडले. यातून राजांनी १६ ऑगस्ट १६६६ रोजी हिकमतीने सुटका करवून घेतली आणि २६ सप्टेंबर १६६६ रोजी राजगडी मांसाहेबांसमोर आशीर्वाद घेण्यासाठी प्रगट झाले. आल्याआल्या राजांनी फौजेची परत एकदा नीट मांडणी केली, फौजेचे नियम ठरवून दिले, जमाखर्चाची नोंद केली आणि गडांना भेट देण्यास सुरुवात केली. अशातच ते मालवणचा जलदुर्ग पाहण्यास आले. समुद्रातून मान वर काढणारा तट त्यांनी डोळे भरून पाहिला. अपार कष्ट करणाऱ्या पण त्या कष्टांची तमा न बाळगणाऱ्या लोकांचे कौतुक केले. समुद्रावर तरांडी, गलबते, माचवे, दुबारे, संगमिऱ्या अशा अनेक जातींच्या नौका तरंगत होत्या. लाटांवर हेलावणाऱ्या त्या नौका पाहून राजांचे मन भरून आले. अशातच औरंगजेबाशी सन्मानपूर्वक तह झाला. त्यामुळे निश्चिंत होऊन राजांनी कोंकण भागावर लक्ष द्यायला सुरुवात केली.

---

शांत राहणे केव्हाही चांगले; कारण जगात पाहिले तर जास्त बोलणारेच दुःखी असतात!

हां..हां..म्हणता ऑक्टोबर १६६८ चा मास उजाडला. गोव्यात उठाव करून निवडक मावळ्यांसह शिवबाराजे गोव्यावर छुपा हल्ला चढवण्याच्या तयारीने सरहद्दीवरील नार्वे गावी आले. पण कुठे तरी माशी शिंकली आणि ही बातमी फुटली. राजांचे हेर फिरंग्यांनी कैद केले. हताश होऊन राजांना गोवा ताब्यात घेण्याचा विचार सोडून द्यावा लागला. ते परत राजगडी जायच्या तयारीत असतांनाच जवळच्या सिंधुदुर्गाचे काम पूर्ण झाल्याचा निरोप मिळाला. राजे गोव्याचे शल्य विसरले. नार्वेची छावणी उठली आणि मालवणच्या रोखाने घोडी भरघाव सुटली. राजे येत आहेत, हे कळताच गडाच्या ईशान्य महाद्वारासमोर लोकांची एकच गर्दी उसळली. कारभारी गोविंद विश्वनाथांनी राजांना लवून मुजरा केला आणि हर्षभरीत राजांनी गळ्यातला कंठा उतरवून गोविंदरावांच्या हाती दिला. राजे चालू लागले. गडाच्या प्रवेशद्वारातून आत जाऊन राजे प्रवेशद्वारी उभे राहिले. नगारा झडला. शिंगांचा आवाज आकाशाला भिडला. राजांनी हात लावून उंबरठ्याला हात लावून मुजरा केला आणि सिंधुदुर्गात प्रवेश केला. राजांच्या बरोबर प्रभू, मोरोपंत, अन्नाजी, बाळाजी आवजी, कोंडाजी फर्जंद, रामचंद्रपंत नाईक, जिवा महाला चालत होते. मागून तानाजी, येसाजी, गडावरचे लोक आणि राजांची शिबंदी जात होती. किल्ल्याच्या आवारात बांधलेली घरटी, दारूकोठार, अन्नधान्याचे कोठार पाहत राजे किल्ल्याच्या विहिरीपाशी आले. निर्मळ पाण्याने भरलेली ती विहीर बघून राजांनी हात जोडले. राजे तट-बुरूज पाहत होते. राजे निशानीच्या बुरुजावर चढले. आकाशात डौलाने फडकणारा भगवा पाहून त्यांचे मन आनंदतिरेकाने भरून आले. सूर्य माथ्यावर आला होता. राजांची नजर क्षितिजाला टेकलेल्या समुद्रावरून फिरत होती. राजे अन्नाजीपंतांना म्हणाले, शेकडो वर्षांपासून दुर्लक्षित राहिलेल्या समुद्री सीमेवरून आलेले हे टोपीकर, फिरंगी कसे भारतभूमीवर आले आणि कसे राज्यकर्ते झाले, ते आपल्या सर्वांना चांगलेच ठाऊक आहे. इथे लुटलेल्या तांदळाच्या, मसाल्यांचा, रत्नांच्या आणि कापडाच्या व्यापारावर ते कसे मदमस्त झाले आहेत, हेही आपण पाहत आहोत. आपल्याच समुद्रात उतरणाऱ्या आपल्याच होड्यांना कार्ताज (परवाना) घ्यावा लागायची नामुष्की इथल्या भूमीपूत्रांवर आली होती, ही नाचक्की आता दूर होणार. आता या सिंधुदुर्गाच्या उभारणीनं मस्तवाल झालेला हबशी नमेल, टोपीकर आणि फिरंग्यांना आमच्या सागरी सत्तेची जाणीव होईल. वाडीच्या सावंतांना चाचेगिरी करण्याचे धारिष्ट्य राहणार नाही. साऱ्या कोंकणपट्टीवर सत्ता राहील, एवढं आरमार आपण उभं करू. राजांनी मोठ्या थाटात सिंधुदुर्गाची वास्तुशांती केली. मुहूर्त साधून कारभाऱ्यांनी सोन्याच्या परातीत ओला चुना टाकून त्यावर शिवबाराजांच्या डाव्या पायाचा आणि उजव्या हाताच्या पंजाचा ठसा उमटवून घेतला आणि अलगद मुख्य प्रवेशद्वाराच्या बाजूच्या बुरुजाच्या चढणीवर दोन वेगवेगळ्या देवळ्या बांधून त्यात ठेऊन दिला. राजांनी कामगारांना कडी, मंदिल वाटले आणि गरजूंना अर्धा, एक गुंठा असे करत किल्ल्यातील जमिनींचे वाटप करून दिले. त्यामुळे प्रजेत एकच आनंद उसळला. तसेच आलेल्या पाहुण्यांना नजराणे दिले. सरतेशेवटी त्या जलदुर्गावर रायाजी भोसले याला किल्लेदार नेमून राजे राजगडी परतले.

सिंधुसागरास पालाण घालणाऱ्या या जलदुर्गास भेट देण्याची संधी मला २०२५ च्या डिसेंबर महिन्यात लाभली. नावेतून पंधरा-वीस मिनिटांच्या प्रवासात डाव्या हातास सिंधुदुर्गाचा संरक्षक दुर्ग असलेला पद्मगड आपले लक्ष वेधून घेतो. बोटीतून पायउतार होताच आपण गोमुख बांधणीच्या महादरवाज्याजवळ येऊन पोहोचतो. मोठ्या खुबीनं दोन बुलंद बुरुजांच्या बोचक्यात हा दरवाजा लपलेला आहे. दरवाज्यासमोरच हनुमंताची छोटेखानी मंदिर आहे. प्रवेशद्वाराच्या आत पहारेकऱ्यांसाठी देवड्या असून, तिथे एक तोफ मांडून ठेवली आहे.

सिंधुदुर्ग किल्ला हा चार कि.मी. परिघात पसरलेला असून, याच्या सर्पाकार तटबंदीमध्ये तब्बल बेचाळीस बुरूज आहेत. प्रवेशद्वाराच्या उजवीकडे जाण्यासाठी दगडी जिना आहे. इथे दोन दगडी कोनाडे असून त्यात शिवबाराजेंच्या अनुक्रमे उजव्या हाताचा आणि डाव्या पायाचा ठसा ठेवला आहे.

तटावरून फेरी मारतांना आपणास शत्रूवर अचूक मारा करण्यासाठी इथे जागोजागी जंग्यांची वैशिष्ट्यपूर्ण रचना केलेली दिसते. किल्ले सिंधुदुर्गावर कांही बुरूज चिलखतासारखे बाहेर काढले आहेत, बहुतांश सर्पाकार तटबंदी असली तरी एका ठिकाणी ती काटकोनात गडाच्या आत वळवली आहे. पुढे तटफेरी करत आपण चोर दरवाजाजवळ येऊन पोहोचतो. या दरवाजातून बाहेर पडताच आपण वाळूच्या पुळणावर येतो. हा भाग 'राणीचा वेळा' म्हणून ओळखला जातो. चोर दरवाजा पाहून झाल्यावर आपण गडाच्या आत स्वतंत्र उभ्या असलेल्या निशाणीच्या बुरुजाजवळ येतो. या बुरुजालगतच दुधबाव, साखरबाव, दहीबाव अशा गोड्या पाण्याच्या विहिरी आहेत. इथून जवळच भगवती देवीचे आणि महादेवाचे मंदिर आहे. या मंदिराच्या आत एक विहीर आहे. ही मंदिरे पाहून पुढे गेल्यावर आपण शिवपुत्र छत्रपती राजाराम महाराजांनी उभारलेल्या शिवराजेश्वर मंदिराजवळ येऊन पोहोचतो. मंदिराच्या गाभाऱ्यात शिवाजी महाराजांची काळ्या पाषाणातील विरासनातील मूर्ती आहे. कोल्हापूरच्या राजश्री शाहू महाराजांनी १९०६-०७ या कालावधीत मंदिराच्या बाहेरील सभामंडपाचे काम केले. प्रत्येक मराठी माणसाने नतमस्तक व्हावे, असे हे ठिकाण आहे. या मंदिरातून परत गडप्रवेश केलेल्या ठिकाणी येतांना जरीमरीचे मंदिर लागते.

सिंधुदुर्गाचे बांधकाम १६६४ साली सुरू झाले आणि १६६८ साली पूर्ण झाले. या दुर्गाच्या बांधकामासाठी महाराजांनी तब्बल एक कोटी होन खर्च केले. १६६८ मध्ये रामचंद्रपंत अमात्यांना राजांनी गडाची सबनीशी दिली. शिवछत्रपती आणि संभाजी महाराजांच्या कालावधीत या गडाकडे कुणी वाकड्या नजरेने पाहिले नाही. पुढे शाहू व ताराराणी यांच्या गृहकलहात महाराणी ताराबाई १७०८ मध्ये सिंधुदुर्गावर आल्या व वर्षअखेरपर्यंत गडावरच राहिल्या. पुढे शाहू आणि ताराबाई यांच्यातील वारणेच्या तहानुसार सिंधुदुर्गाचा ताबा करवीरकर छत्रपतींकडे गेला. १६ नोव्हेंबर १७६३ रोजी पोर्तुगीजांनी सिंधुदुर्गावर हल्ला केला. पण सिंधुदुर्ग त्यांना जिंकता आला नाही. २८ जानेवारी १७६५ रोजी मेजर गोडार्ड व कॅप्टन वाटसन् यांनी सिंधुदुर्ग जिंकून घेत त्याचे नांव 'फोर्ट ऑगस्टस' ठेवले. पुढे कोल्हापूर व ईस्ट इंडिया कंपनी यांच्यातील एका करारानुसार २ जानेवारी १७६६ रोजी सिंधुदुर्गाचा ताबा मराठ्यांकडे आला. यानंतर निपाणीकर देसाई विरुद्ध इंग्रजांनी मदत करावी व त्या मोबदल्यात करवीरकरांनी सिंधुदुर्ग इंग्रजांना द्यावा असा करार दोघांमध्ये झाला. या करारानुसार १७९२ मध्ये सिंधुदुर्ग इंग्रजांच्या ताब्यात गेला. थोडक्यात; पोर्तुगीज, इंग्रज, डच, मुघल यांच्या जुलमी जाचाने कोंकण पिचत असतांना, त्यांची चाकरी करत जगत जगत मरत असतांना, मरत मरत जगत असतांना शिवबाराजेंनी सिंधुसागरावर दुर्ग उभारून इथल्या प्रत्येक माणसास आशेचा किरण दाखवला आणि पिचलेल्या मराठी माणसाचा कणा कणखर, पोलादी बनवला आणि रयतेच्या मनातले स्वराज्य उभारून दिले. हे स्वराज्य इथल्या भूमीपूत्रांनी पुढील शंभरपेक्षा जास्त वर्षे उपभोगले, हे निराळे सांगणे न लगे.

**– श्री. दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी, उज्ज्वलनगर,
नागपूर-४४००२५
मो.नं.: ९८३४६३६६५५
इ-मेल- wandalkardilipgmail.com

# मन आणि आरोग्य

*शारीरिक आरोग्य उत्तम राहण्याकरिता 'मन' हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. या मनाची ओळख, त्याचा अभ्यास आणि त्याचे कार्य समजून घेणे फार महत्त्वाचे. तरच आपण आयुष्यात सुखी राहतो.- संपादक*

निसर्ग मातेने आपणांस भरपूर देऊ केले आहे. सुंदर आकाश. पाणी, हवा, धरती, वनस्पती, झाडे, विविध प्रकारचे धान्य इ. अनेक गोष्टींमुळे आपले जीवन समृद्ध झाले आहे. यापेक्षा वेगळी अशी अनमोल गोष्ट मिळाली आहे ती म्हणजे आपले शरीर. 'माझ्या जवळ शरीर नावाची अतुलनीय संपत्ती आहे' असा विचार तुम्ही कधी केला आहे का?

बाहेरून दिसणारे हात, पाय, नाक, डोळे इ. एवढीच आपली संपदा नाही; तर शरीरामध्ये अनेक अशा गोष्टी आहेत की अजून तरी त्यांची जागा घेणारे संशोधन झाले नाही. यामध्ये मेंदू व त्यांचे भाग, हृदय, फुप्फुसे, यकृत, मूत्रपिंड, रक्तवाहिन्या व वेगवेगळी हाडे यांचा प्रामुख्याने समावेश होतो. पुढे खोलात जाऊन बोलायचे झाले तर आपल्या शरीरात ५-६ लिटर रक्त असते, ३० ट्रिलीयन पेशी असतात, दोन्ही मूत्रपिंडांमध्ये २० लाख सूक्ष्म चाळणी (microfilters) असतात. यामुळे १ ते २ लिटर पाणी व नको असलेल्या घातक गोष्टी बाहेर टाकल्या जातात. प्रती मिनिटाला ७२ वेळा हृदयाचे ठोके पडतात म्हणजे १ लाख प्रती दिन व ३४ मिलीयन प्रत्येक वर्षाला ठोके पडतात. याशिवाय शरीरात भरपूर क्रिया दिवस-रात्र चालू असतात. वैद्यकशास्त्र व विज्ञानाने भरपूर प्रगती केली आहे, पण शरीररूपी यंत्रला देखभाल करणारे व पर्यायी असे शोधण्यास यश नाही आले.

आपण वाहन खरेदी केल्यानंतर त्यामध्ये थोडासा बिघाड झाला तरी लगेच मेकॅनिककडे घेऊन जातो किंवा वाहन व्यवस्थित चालावे म्हणून पूर्ण काळजी घेत असतो. तसे आपण आपल्या शरीररूपी यंत्रसाठी काही करतो का? खरं म्हणजे शरीर हे यंत्रापेक्षा खूप महत्त्वाचं आहे. ज्यांचं आपल्या शरीरावर प्रेम आहे, जे आपल्या शरीराचा आदर करतात आणि निरोगी राहण्यासाठी जे प्रयत्नशील आहेत त्यांच्यासाठी हा लेख नक्कीच उपयुक्त ठरेल यात शंका नाही.

वर दिलेल्या अवयवांव्यतिरिक्त अजून एक महत्त्वाची संस्था प्रत्येकाच्या शरीरात कार्यरत असते. ती म्हणजे अंतरस्रावी ग्रंथी प्रणाली. या ग्रंथीमधून विविध संप्रेरके/ रसायने स्रवत असतात. उदा. स्वादुपिंडातून इन्सुलिन स्रवते जे रक्तातील साखर नियंत्रित करते. आपले शारीरिक व मानसिक आरोग्य बिघडण्यास प्रमुख कारण म्हणजे ग्रंथींच्या स्रवणामध्ये आलेले असंतुलन. यासाठीच या ग्रंथी संस्थेची (endocrine gland system) काळजी घेणे महत्त्वाचे आहे. वैद्यकीय शास्त्रामध्ये खोलवर न जाता, आपले विचार, भावना, वाचन व आपल्या आजूबाजूचे वातावरण यांचा ग्रंथांवर कसा परिणाम होतो व तब्बेत का बिघडते हे पाहणार आहोत.

आपणा सर्वांना मन नावाचा न दिसणारा अवयव आहे. साधारणतः ६०० पेक्षा जास्त विचार रोज मनामध्ये येत असतात. म्हणजे जागेपणी ७ विचार मनात येतात. शिवाय आपण काही वाचतो, बोलतो, ऐकतो किंवा मोबाईलवर काही करतो. यामुळे मनात कळत नकळत

सुंदर चेहरा काही वर्षांत बदलतो, पण तुमचे सुंदर विचार आयुष्यभर लोकांच्या मनात जिवंत राहतात.

वेगवेगळे तरंग उमटतात. या तरंगाना भावना म्हणू या. कधी कधी या भावना प्रेरणादायी, आनंददायी म्हणजे सकारात्मक असतात तर दुःख देणाऱ्या, राग उत्पन्न करणाऱ्या म्हणजे नकारात्मक असतात. दया, सहिष्णुता, सहनशीलता, कृतज्ञता, विश्वास आभार प्रेम या सर्व सकारात्मक भावना आहेत. याउलट द्वेष, संताप, संशय, कृतघ्नता व मत्सर या नकारात्मक भावना आहेत.

आपल्या मनात सकारात्मक भावना असल्या तर Parasympathetic nervous system कार्यरत असते व ग्रंथींचे स्रवणे समतोल असते. यामुळे आपले आरोग्य चांगले रहाते व रोगप्रतिकारक शक्ती वाढते. याउलट नेहमी राग केला किंवा मनामध्ये नकारात्मक भावनांचे प्राबल्य असेल तर Symphathetic nervous system कार्यरत होते. यामुळे ग्रंथींच्या स्राव असंतुलित होतो व त्याचा परिणाम तब्बेत बिघडण्यावर होतो. झोप येत नाही. पचनक्रिया बिघडते शिवाय रोगप्रतिकारक शक्ती कमी होते.

आपण जेव्हा पहिले भाषण केले असेल त्यावेळी हृदयाचे ठोके वाढतात. तसेच जेव्हा आपण हलकं आवडीचं संगीत ऐकतो त्यावेळी मन शांत होते. आपण ध्यान केले किंवा भूतकाळातील चांगल्या आठवणी काढल्या तर त्याचा चांगला परिणाम शरीरावर होतो. म्हणजे मन आणि शरीर यांचा थेट संबंध आहे. आपल्या मनातील सर्व प्रकारच्या भावना, विचार मेंदूकडे पोहचतात व नंतर मध्यवर्ती मज्जासंस्थेमार्फत सर्व शरीरभर त्यांचे संदेश जातात. त्याचमुळे शरीरामध्ये विविध रसायने व संप्रेरके तयार होतात आणि त्यांचा परिणाम शरीरावर दिसतो.

नकारात्मक भावनांमुळे Sympathetic nervous system जागृत होते, शरीर 'fight or flight' अवस्थेत येते. याचवेळी शरीरात cortisol तयार होते ज्याचा परिणाम रक्तवाहिन्यांवर होतो व हळूहळू आपण हृदयरोगाकडे वाटचाल करतो. ताणतणाव, धोका, भीती इ. मुळे अड्रेनलाईन हे संप्रेरक स्रवते व त्यामुळे रक्तदाब व रक्तातील साखरेची पातळी वाढते. हे फक्त २-३ महत्त्वाचे परिणाम सांगितले आहेत. याशिवाय नकारात्मकतेमुळे शरीरामध्ये अनेक नको असलेल्या रासायनिक क्रियांना आपण निमंत्रण देतो. त्यामुळे मन सकारात्मक भावनांना भरले तर आरोग्य चांगले राहते.

ताण, धावपळ टाळा. सकस आहार, ध्यान व शक्य असेल तेवढा व्यायाम यामुळे आपली ग्रंथी संस्था समतोलपणे कार्यरत राहते.

पुढे ४ महत्त्वाची संप्रेरके, त्यांचे महत्त्व व काही उपाय आहेत.

(१) इंडॉर्फिन - यामुळे ताण-तणाव कमी होतो व हे वेदनाशामक आहे. यासाठी व्यायाम करा, कला जोपासा, हसा, विनोदी कार्यक्रम पहा.

(२) डोपामाईन - हे प्रेरणादायी व आनंद देणारे संप्रेरक आहे. विविध प्रसंग साजरे करा, आवडीचे पदार्थ मर्यादित खा, आवडीचे संगीत ऐका, कामे वेळेत पूर्ण करा. 'Feel good' जोपासा.

(३) सिरोटोनिन - मनाची एकाग्रता व झोपेसाठी हे संप्रेरक मदत करते. यासाठी ध्यान करा, उन्हात बसा, निसर्गात फिरा, पोहणे, सायकलिंग सारखे व्यायाम करा.

(४) ऑक्सिटोसिन - स्नेहबंध जोडणारे, सामाजिक प्रतिमा जोपासणारे व नाती टिकवणारे हे संप्रेरक आहे. दुसऱ्याची स्तुती व प्रशंसा करा, कुटुंबातील सदस्य, मित्रमंडळी यांच्याशी प्रेमाने वागा, प्रिय व्यक्तींबरोबर वेळ घालवा, मायेने स्पर्श करा.

**प्रा. डॉ. अशोक पाटील**

●●●

# चित्रकार गोपाळ देऊसकर : कलावंत आणि माणूस

*चंद्रशेखर टिळक यांनी त्यांच्या खास ओघवत्या, मिश्कील व ज्ञानवर्धक शैलीत काहीशी तुलनात्मक भाषा खास ढंगाने वापरून सुहास बहुळकरांनी लिहिलेल्या चित्रकार देऊसकरांविषयीचा हा एक मनोवेधक लेख – संपादक*

आपल्या व्यावसायिक आयुष्यात एखादा प्रत्यक्ष अनुभव घेत असताना आपल्याला आपण त्यावेळी वैयक्तिक आयुष्यात जी पुस्तके वाचत असतो त्यातले प्रसंग आठवत राहतात का ?

गेल्या आठवड्यात निदान माझ्या बाबतीत तरी तसे झाले.

त्यादिवशी सकाळी मला युरोपमधील एका देशाच्या मुंबईतील दूतावासात त्यांच्या राजदूतांनी भेटायला बोलावले होते. त्या देशाचे इथले आणि तिथले अनेक उच्चपदस्थ त्या बैठकीला उपस्थित असतील याची मला खात्री होतीच !

आणि मला त्यादिवशी सुहास बहुळकर लिखित आणि राजहंस प्रकाशन प्रकाशित मार्च २०१५ मध्ये पहिली आवृत्ती आणि मार्च २०१६ मधे दुसरी आवृत्ती प्रसिद्ध झालेले 'चित्रकार गोपाळ देऊसकर : कलावंत आणि माणूस' (पाने २५६, किंमत ३५० रुपये) या पुस्तकाची सकाळपासूनच आठवण यायला लागली.

त्याचे असे झाले ....

त्या दिवशी सकाळी माझ्या डोंबिवलीतील घरापासून त्या दूतावासात पोचेपर्यंतच्या प्रवासात कारमधे त्यादिवशीचे अनेक पेपर्स वाचत होतो. त्या सगळ्या वर्तमानपत्रात आदल्या दिवशी झालेले उस्ताद झाकीर हुसेन यांचे निधन आणि त्यानिमित्ताने अनेकांचे श्रद्धांजलीपर संदेश होते. काही मोजके अपवाद वगळता एकूणएक श्रद्धांजली संदेश इतके गोलमाल, वरपांगी, पोकळ होते की, बोलण्याची सोय नव्हती. ते वाचताना सुहास बहुळकर यांच्या 'चित्रकार देऊसकर' या पुस्तकाच्या सुरुवातीला त्यांचे असलेले मनोगत मला आठवायला लागले. त्या मनोगतात चित्रकार देऊसकर यांच्या निधनानंतर पु. ल. देशपांडे, श्री. पु. भागवत आणि व्यंकटेश माडगूळकर यांच्या अशाच गोलमाल श्रद्धांजलीचा उल्लेख आहे.

त्यादिवशी या पुस्तकाची आठवण येण्याचे, येत राहण्याचे योग माझ्या पत्रिकेत बहुतेक लिहिलेच होते...

त्यादिवशी त्या दूतावासातील मीटिंगमधे त्या देशाचा सर्वोच्च आधिकारी जेव्हा सामोरा आला, तेव्हा 'रूबाबदार, दिमाखदार व्यक्तिमत्त्व' हे या पुस्तकात चित्रकार देऊसकर यांचे केलेले वर्णन मला आठवायला लागले. नंतर ही मीटिंग सुरू झाली.

या मीटिंगची सुरुवात गेली अनेक वर्षे या देशाच्या वतीने अमेरिकेत काम करत असलेल्या एका उच्चपदस्थ आधिकाऱ्याच्या निवेदनाने झाली. ते निवेदन इतके उठपटांग होते की, सुहास बहुळकर यांच्या या पुस्तकातील 'इतर देशातील लोकही काही कमी दांभिक नसतात' या वाक्याची प्रचिती येत होती.

त्यानंतर जेव्हा या मीटिंगचा मुख्य भाग असणारे माझे निवेदन सुरू झाले तेव्हा मी या विषयाची योग्य बाजू मांडायला सुरुवात केली. त्यावर उपरोक्त अधिकाऱ्याने वारंवार शाब्दिक आडमुठेपणा करायला सुरुवात केली. मग मात्र बरेचसे राजनैतिक शिष्टाचार

थोडे बाजूला ठेवत मी रोखठोक उत्तरे द्यायला सुरुवात केली.

एक वेळ अशी आली की 'I know my country very well ; I have come here to know you and your country and your intentions better' असे उत्तर माझ्या तोंडून निघून गेले.

या मीटिंगमधून बाहेर पडताना माझ्या लक्षात आले की, हे विधान चित्रकार देऊसकर यांचे आहे.

हे एकापाठोपाठ होत गेल्याने असेल कदाचित; पण त्यादिवशी मी परतीचा प्रवास सुरू करायच्याआधीच हे पुस्तक मी फोन करून राजहंस प्रकाशन मधून मागवून घेतले. आणि राजहंस प्रकाशनच्या विनायक पणशीकर सरानीही हे पुस्तक मला त्याच दिवशी पाठवले.

असो.

चित्रकार गोपाळ देऊसकर ( ११ सप्टेंबर १९११ – ८ फेब्रुवारी १९९४).

सर्वार्थाने एक प्रचंड मोठे नाव इतकीच माहिती मला असताना हे पुस्तक पहिल्यांदा वाचले होते.

पण यावेळी हे पुस्तक परत वाचताना चित्रकार गोपाळ (बापू) देऊसकर आणि शिल्पकार विनायक पांडुरंग करमरकर यांची मनोमन तुलना व्हायला लागली.

अगदी माझ्याही नकळत.

कदाचित सुहास बहुळकर यांचे ‘शिल्पकार करमरकर’ हे पुस्तक अगदी आत्ता अवघ्या काही दिवसांपूर्वी वाचले असल्याचा तो परिणाम असावा ...

मनात आले ....

- चित्रकार देऊसकर आणि शिल्पकार करमरकर दोघेही मराठी किंवा महाराष्ट्रीयन.
- चित्रकार देऊसकर आणि शिल्पकार करमरकर दोघेही स्पष्टवक्ते.
- चित्रकार देऊसकर आणि शिल्पकार करमरकर दोघेही रूबाबदार व दिमाखदार.
- चित्रकार देऊसकर आणि शिल्पकार करमरकर दोघेही स्वतःच्या शिस्तीत आणि मस्तीत जगणारे.
- चित्रकार देऊसकर आणि शिल्पकार करमरकर या दोघांनाही सिगारेटचा नाद.
- चित्रकार देऊसकर आणि शिल्पकार करमरकर दोघांचाही या ना त्या तऱ्हेने जे. जे. स्कूल ऑफ आर्टशी संबंध.
- चित्रकार देऊसकर आणि शिल्पकार करमरकर या दोघांचेही पूर्वज घरी मूर्ती बनवत.
- अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराज ही शिल्पकार करमरकर आणि चित्रकार देऊसकर यांची महत्त्वपूर्ण कलाकृती.
- या ना त्या प्रकारे चित्रकार देऊसकर आणि शिल्पकार करमरकर यांचा लोकमान्य टिळक या विषयाशी संबंध आला.
- जे. आर. डी. टाटा यांच्या कार्यसंस्कृतीशी चित्रकार देऊसकर आणि शिल्पकार करमरकर या दोघांचाही संबंध आला.
- Nude Model चा अभ्यास करत शरीर-रचनेचा अभ्यास करून त्यांचे पुरेपूर प्रतिबिंब आपल्या कलाकृतीत उमटवणे हे चित्रकार देऊसकर आणि शिल्पकार करमरकर या दोघांचेही कार्यवैशिष्ट्य.
- ‘संसार करणार असाल तर त्याची पूर्ण तरतूद करावीच लागते’ या तत्त्वावर चित्रकार देऊसकर आणि शिल्पकार करमरकर या दोघांचाही दांडगा विश्वास.

* अभिव्यक्तीतील श्लील –अश्लीलता या वादाला चित्रकार देऊसकर आणि शिल्पकार करमरकर या दोघांनाही या ना त्या कारणाने सामोरे जावे लागले.

* कलेचे जतन आणि संवर्धन व समर्थन याबाबतीत स्वातंत्र्यपूर्व काळातील संस्थानिक स्वातंत्र्योत्तर काळातील राजकारण्यापेक्षा चांगले होते असा अनुभव चित्रकार देऊसकर आणि शिल्पकार करमरकर या दोघांनाही आला.

* चित्रकार देऊसकर आणि शिल्पकार करमरकर हे दोघेही काहीकाळ तरी परदेशात शिकले; पण या दोघांनीही संपूर्ण कारकीर्द मात्र हिंदुस्तानात केली.

* चित्रकार देऊसकर आणि शिल्पकार करमरकर या दोघांनीही आपल्या आपल्या कलेला (अनुक्रमे चित्रकला आणि शिल्पकला) राजमान्यता आणि समाजमान्यता मिळवून दिली.

* कलेच्या प्रांगणात रमून एकवेळ वैयक्तिक मानसिक आनंद मिळेल, पण चरितार्थासाठी लागणारा पैसा मिळेल का? या पिढीजात प्रश्नाला पहिले तडे पाडण्याचे श्रेय चित्रकार देऊसकर आणि शिल्पकार करमरकर यांना जाते.

लेखक म्हणून सुहास बहुळकर, चित्रकार देऊसकर, शिल्पकार करमरकर या तिघांचाही एक गंमतीचा योगायोग आहे.

* चित्रकार देऊसकर आणि शिल्पकार करमरकर या दोन्ही व्यक्तिमत्त्वांवर सुहास बहुळकर यांनी पहिल्यांदा दिवाळी अंकात लेख लिहिले.

  आणि मग या दोघांवर पुस्तके लिहिली.

* ही दोन्ही पुस्तके एकाच वर्षी प्रसिद्ध झाली.

* ही दोन्ही पुस्तके राजहंस प्रकाशनने प्रकाशित केली आहेत.

* या दोन्ही पुस्तकांवर संपादकीय संस्कार राजहंस प्रकाशनातर्फे सुहास बहुळकर यांची मोठी मेहुणी विनया खडपेकर यांनी केले आहेत.

* ही दोन्ही पुस्तके खूप काळ रेंगाळली असे स्वतः सुहास बहुळकरच म्हणतात.

* हा माझा विषय जरासुद्धा नसून सुद्धा ही दोन्ही पुस्तके मी एकापेक्षा जास्त वेळा वाचली आहेत आणि इतकेच नव्हे तर, नको इतका अगोचरपणा करून त्यावर लेख लिहिण्याचा उद्दामपणाही केला आहे.

या पुस्तकाची सुरुवातच मुळी चित्रकार देऊसकर यांनी जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मधे केलेल्या प्रात्यक्षिक कार्यक्रमाने होते. त्यावेळी चित्रकार देऊसकर दोन बाजूला दोन सुंदर ललना घेऊन कसे दिसले याचे वर्णन या पुस्तकाचे लेखक सुहास बहुळकर यांनी केले आहे. सुहास बहुळकर वृत्तीने सालस व सज्जन असल्याने त्यांना त्यावेळी महात्मा गांधी आठवले. पण हे वर्णन वाचताना मला मात्र जागतिक गुंतवणूक क्षेत्राचा आद्य कुलगुरू बेंजामिन ग्रॅहॅम (८ मे १८९४ – २१ सप्टेंबर १९७६) आठवत होता.

हा संपूर्ण प्रसंग वाचताना केवळ चित्रकार देऊसकर यांचे दिसणे – असणे – वागणे यात बेंजामिन ग्रॅहॅम वर्गात शिकवत असताना असाच वागत असे वर्णन नेहमीच केले जाते.

त्यानंतर देऊसकर यांनी वर्गातील अत्यंत गोऱ्या आणि टंच (हल्लीच्या परिभाषेत कडक) अशा 'धन बिलिमोरिया'ची निवड केली. तिने कसे बसायचे, कुठे बसायचे, ती मॉडेल म्हणून जिथे बसेल तिथे काय

असावे - काय नसावे, तिची मान कोणत्या पोझिशन मधे हवी याबाबत चित्रकार देऊसकर अत्यंत स्पष्ट होते. याबाबतचे या पुस्तकातले वर्णन आणि Security Analysis वर्गात शिकवताना (आणि नंतर या विषयावर अतिशय प्रसिद्ध असे कालातीत पुस्तक लिहिताना) बेंजामिन ग्रॅहॅम असेच असायचे असे अत्यंत चविष्टपण गुंतवणूक क्षेत्रात आजही सांगितले जाते.

पुस्तकाच्या नंतरच्या भागात चित्रकार देऊसकर यांनी त्यांच्यापेक्षा वयाने खूप लहान असणाऱ्या मुलीशी लग्न केले हा भाग येतो. हे देऊसकरांचं दुसरे लग्न होते. आणि ही मुलगी त्यांच्या पहिल्या लग्नापासून झालेल्या मुलापेक्षाही एक वर्षाने लहान होती. त्यामुळे 'मुलाच्या लग्नासाठी पाहिलेली मुलगी चित्रकार देऊसकरानी स्वत:साठीच मिळवली' असे काही लोक त्यावेळी म्हणत असत असे या पुस्तकात सांगितले आहे.

हे वाचताना बेंजामिन ग्रॅहॅम आठवण्याचे कारण म्हणजे हे आणि असेच सगळे, चित्रकार देऊसकर यांच्यासारखेच बेंजामिन ग्रॅहॅम यांच्याही बाबतीत झाले आहे.

'चित्रकार गोपाळ देऊसकर : माणूस आणि कलाकार' या सुहास बहुळकर लिखित पुस्तकात चित्रकार देऊसकर आणि मराठी रंगभूमी आणि मराठी संगीत सृष्टी यांचा संबंध आल्याचा उल्लेख आहे. अगदी असाच प्रकार गुंतवणूक गुरू बेंजामिन ग्रॅहॅम यांच्या बाबतीतही आहे.

(या बेंजामिन ग्रॅहॅम विषयी अजून माहिती हवी असेल तर माझ्या 'गुंतवणूक पंचायतन' या पुस्तकाचा जरूर विचार करा. राजहंस प्रकाशनने प्रकाशित केलेल्या या पुस्तकाची सध्या १५वी आवृत्ती सुरू आहे.)

चित्रकलेचं प्रात्यक्षिक दाखवताना चित्रकार देऊसकर म्हणतात "Graceful neck on proper shoulder and proportionate head on graceful neck results into good portraiture." गुंतवणुक योग्य कंपनीची निवड करतांना लक्षात घेण्याचे जे निकष बेंजामिन ग्रॅहॅम यांनी सांगितले आहेत त्यातील एकाचे शब्दांकन अगदी अशाच धाटणीचे आहे.

Great People really think alike हेच खरं !

इंग्लंडला रॉयल अकॅडमी मधे चित्रकार गोपाळ देऊसकर शिकायला गेल्यावर त्यांनी इंग्लिश भाषेवर प्रभुत्व मिळवले. त्यांना तिथे मिळालेल्या मित्र - मैत्रिणी बरोबर त्यांनी तिथल्या अनेक देशांत भ्रमंती केली. त्यातून तिथल्या काही भाषांशी त्यांची ओळख झाली.

याबाबत 'भाषा शिकायची तर ती पुरुषाकडून शिकू नये; भाषा ही बाईकडूनच शिकावी' अशा मताचे चित्रकार गोपाळ (बापू) देऊसकर होते असा उल्लेख सुहास बहुळकर लिखित या पुस्तकात वाचला आणि मला सुप्रसिद्ध कवी गुलजार साहेब आठवले. कारण 'एखादी भाषा शिकायची तर ती भाषा जिची मातृभाषा आहे अशा मुलीच्या प्रेमात पडावे' असे गुलजार साहेब म्हणतात.

हे सगळे वाचताना - आठवताना सहजच मनात आले ... असे चित्रकार देऊसकर आणि कवी गुलजार का म्हणत असावेत ?

कारण सकृतदर्शनी हे दोघे वेगळ्या क्षेत्रातले!

हे दोघे वेगळ्या काळातले !

मग वाटले... या दोघांचे म्हणणे बरोबरच आहे.

भाषा काय किंवा कला काय ...

ते भ्रम नाहीत,

ते संभ्रम नाहीत; तर भाषा आणि कला हे विभ्रम आहेत आणि विभ्रम ही स्त्रियांची मक्तेदारी आहे.

भाषा, कला, स्त्री हे तिन्ही शब्द स्त्रीलिंगी आहेत. हा योगायोग नसतो.

---

काळजी करण्याने जीवनातील समस्या सुटत तर नाहीतच, उलट त्या अधिकच उग्र स्वरूप धारण करतात.

- सद्गुरू श्री वामनराव पै

आयुष्यापासून आपल्याला काय मिळवायचे आहे हे अनाथ लहानपण भोगलेल्या चित्रकार देऊसकर यांना अगदी पहिल्यापासूनच स्पष्ट असावे असे वाटते. त्यांच्या तरुणपणी त्यांनी त्यांच्या मित्रांना सांगितले होते (पान ३१) -

'माझे भावी जीवनाचे स्वप्न... सुग्रास अन्न, सुंदर कपडा, उंची अत्तर, मॉडेल म्हणून प्रमाणबद्ध सुंदरी, खंडीभर रंग आणि दारूचे पिंप एवढे आपल्याला मिळाले तर संपूर्ण सुखी होऊ.'

चित्रकार देऊसकर (आणि शिल्पकार करमरकर यांनीही) असे ऐश्वर्य मिळवले.

आयुष्यभराच्या कष्टाने, सातत्यपूर्ण कष्टाने मिळवले त्यांनी हे !

हे मिळवण्यासाठी चित्रकार देऊसकर यांची आचार - विचार संहिता काय आणि कशी होती याचे सविस्तर व सोदाहरण वर्णन म्हणजे लेखक सुहास बहुळकर यांचे 'चित्रकार गोपाळ देऊसकर : कलावंत आणि माणूस' हे पुस्तक !

लेखक सुहास बहुळकर सांगत जातात...

* स्वतःवर व स्वतःच्या निर्मितीवर मनापासून प्रेम म्हणजे देऊसकर.
* एकेका गोष्टीचा निकाल लावत पुढे जाण्याची पद्धत म्हणजे देऊसकर.
* रेखाटनावरील प्रभुत्व म्हणजे देऊसकर.
* आकर्षक व प्रभावी रंगसंगती म्हणजे देऊसकर.
* व्यक्तिमत्त्वाचा जोरकस आविष्कार म्हणजे देऊसकर.
* रंगवताना यथातथ्य दर्शनाचा निर्माण केलेला उत्कृष्ट आभास म्हणजे देऊसकर.

आणि

'असे काही नसतेच' अशा थाटात चित्रकार गोपाळ देऊसकर या पुस्तकात सांगितलेल्या एका प्रसंगात म्हणून जातात ...

'डॉक्टरला जसं रोग्याला बरं करता यायला हवं, वकिलाला आरोपीला आरोपातून मुक्त करता यायला हवं; तस व्यावसायिक चित्रकाराला उत्तम व्यक्तिचित्र काढता यायला हवं'

हे म्हणजे व्यावसायिक जगात एखाद्या कंपनीचे Mission Statement असे आहे हे देऊसकरी विधान ... Life Long Mission

अगदी खरं सांगतो ...

'There is much more to flying than eating' असे रिचर्ड बाख त्याच्या 'Jonathan Livingstone Seagul' या पुस्तकात म्हणतो. सुहास बहुळकर त्यांच्या या पुस्तकात (आणि त्यांच्याच शिल्पकार करमरकर या पुस्तकातही) हेच सांगत आहेत.

हे पुस्तक वाचून दरवेळी खाली ठेवताना 'सामान्य माणसे करतात ते लग्न; आणि माझ्यासारखा कविराज करतो तो विवाह' या पुरुषोत्तम दारव्हेकर लिखित 'कट्यार काळजात घुसली' या नाटकातील या वाक्याचा अर्थ दरवेळी नव्याने कळतो हेच खरं !

**- चन्द्रशेखर टिळक**
सी-४०२, राज पार्क,
मढवी बंगल्याजवळ, राजाजी पथ,
डोंबिवली (पूर्व), पिन - ४२१२०१
भ्रमणध्वनी - ९८२०२९२३७६

•••

---

# कायद्याच्या अभ्यासात 'भारतीय मुळां'ची आवश्यकता

*नुकतेच भोपाळ येथील नॅशनल लॉ इन्स्टिट्यूट युनिव्हर्सिटीमध्ये 'वसाहतवादी मानसिकतेच्या पलीकडे: भारतीय कायदेशीर व्यवस्थेवरील पाश्चात्य प्रभावाचा पुनर्विचार' या विषयावर एक परिसंवाद पार पडला. मद्रास उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती एस. ए. धर्माधिकारी यांच्या भाषणातील महत्त्वाच्या मुद्द्यांवर आधारित हा लेख – संपादक*

नुकतेच भोपाळ येथील नॅशनल लॉ इन्स्टिट्यूट युनिव्हर्सिटीमध्ये 'वसाहतवादी मानसिकतेच्या पलीकडे: भारतीय कायदेशीर व्यवस्थेवरील पाश्चात्त्य प्रभावाचा पुनर्विचार' या विषयावर एक परिसंवाद पार पडला. मुख्य न्यायमूर्ती एस. ए. धर्माधिकारी यांचे तेथील प्रबोधनपर भाषण हे केवळ एका कार्यक्रमातील औपचारिकता नव्हती, तर ते भारतीय न्यायव्यवस्थेच्या भविष्यातील दिशेवर प्रकाश टाकणारे एक महत्त्वाचे चिंतन होते.

### बौद्धिक प्रगती आणि सांस्कृतिक तुटलेपण

आज आपण पाहतो की, देशातील नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीज (NLU) अत्यंत बुद्धिवान विद्यार्थी घडवत आहेत. हे तरुण वकील तांत्रिकदृष्ट्या त्यांच्या समकालीनांपेक्षा खूप पुढे आहेत. मात्र, एक चिंताजनक वास्तव असे आहे की, यातील बहुतांश पदवीधरांचे अंतिम ध्येय केवळ वेगाने श्रीमंत होणे हेच बनले आहे. यावर भाष्य करताना न्यायमूर्तींनी एक महत्त्वाचा इशारा दिला:

"We are increasingly witnessing that though NLUs are producing prodigies who are way ahead of their contemporaries, the drawback is that they are graduating with the ultimate aim of becoming millionaires at the fastest pace. Majority of them have a complete disconnect from their cultural and ideological roots."

(अनुवाद : आपण अधिकाधिक पाहत आहोत की, जरी NLUs त्यांच्या समकालीनांपेक्षा खूप पुढे असलेले बुद्धिमान विद्यार्थी तयार करत असले, तरी त्यात एक उणीव अशी आहे की, ते सर्वात वेगाने करोडपती होण्याच्या अंतिम ध्येयाने पदवीधर होत आहेत. त्यांच्यापैकी बहुसंख्यांचा त्यांच्या सांस्कृतिक आणि वैचारिक मुळांशी पूर्णपणे संपर्क तुटलेला आहे.)

आपल्या विधी शाखेच्या विद्यार्थ्यांच्या विचारात केवळ स्थिरता आणि परिपक्वता आणण्यासाठीच नव्हे, तर त्यांना आपल्या 'कर्तव्य' आणि 'कर्मा'बद्दल सजग करण्यासाठी भारतीय परंपरांचे शिक्षण देणे अनिवार्य आहे.

### भारतीय ग्रंथांची प्रासंगिकता

जैन धर्म, बौद्ध धर्म, मनुस्मृती आणि अर्थशास्त्र यांसारख्या प्राचीन ग्रंथांचा आणि समृद्ध साहित्याचा परस्परसंबंध प्रत्येक विधी विद्यार्थ्याला माहीत असायला हवा. न्यायमूर्तींच्या मते:

"Be it the principles of Jainism, Buddhism, Manusrimiti or Arathashastra. The correlation of all these texts and rich literature must be necessarily known to all the law students. They will not only bring stability and maturity in their thinking but also make them enlightened about the great organic Indian culture..."

(अनुवाद: मग ती जैन धर्माची तत्त्वे असोत, बौद्ध धर्म असो, मनुस्मृती असो वा अर्थशास्त्र असो. या सर्व ग्रंथांचा आणि समृद्ध साहित्याचा परस्परसंबंध सर्व विधी विद्यार्थ्यांना माहीत असणे आवश्यक आहे. ते केवळ

त्यांच्या विचारात स्थिरता आणि परिपक्वता आणणार नाहीत, तर त्यांना महान सेंद्रिय भारतीय संस्कृतीबद्दल प्रबोधन देखील करतील...)

पंचतंत्रातील कथा, जातक कथा आणि सम्राट अशोकाच्या काळातील शिकवणाऱ्या सर्वांचे प्रतिबिंब आपल्या भारतीय संविधानाच्या विविध भागांमध्ये उमटलेले आहे. त्यामुळे भारतीय इतिहास आणि विज्ञानावर आधारित एक स्वतंत्र, समर्पित आणि अनिवार्य अभ्यासक्रम विधी महाविद्यालयांमध्ये असणे ही काळाची मागणी आहे.

**वसाहतवादी मानसिकतेचे धुके**

वसाहतवादी 'हँगओव्हर' हा एका धुक्यासारखा आहे, जो आपल्याला आपले स्वतःचे कायदेशीर भूदृश्य स्पष्टपणे पाहण्यापासून रोखत आहे. आजही कायद्याची भाषा इतकी क्लिष्ट आणि 'अराजक इंग्रजी' (Anarchic English) मध्ये आहे की, सामान्य पक्षकाराला न्यायालयाचा युक्तिवाद समजत नाही. न्यायाधीशांना 'लॉर्डशिप' म्हणण्याची पद्धत ही देखील याच जुन्या मानसिकतेचा भाग आहे, जिथे सामान्य माणूस न्यायाची विनवणी करतो, आपला हक्क म्हणून तो मागत नाही.

**लेडी जस्टिस : बदलती ओळख**

सर्वोच्च न्यायालयातील 'लेडी जस्टिस'चा नवीन पुतळा हा आपल्या बदलत्या ओळखीचा पुरावा आहे. पारंपारिक पुतळ्याच्या डोळ्यांवर असलेली पट्टी आता काढण्यात आली आहे. या बदलाचे महत्त्व अधोरेखित करताना न्यायमूर्ती म्हणाले:

"The removal of the blindfold signifies a shift of judiciary's evolving identity. One that acknowledges the need for awareness and sensitivity to inequalities in society rather than blind impartiality."

(अनुवाद: डोळ्यांवरील पट्टी काढून टाकणे हे न्यायव्यवस्थेच्या विकसित ओळखीतील बदलाचे प्रतीक आहे; जी अंध निष्पक्षतेऐवजी समाजातील असमानतेबद्दल जागरूकता आणि संवेदनशीलतेची गरज मान्य करते.)

पुतळ्याच्या हातातील तलवार जाऊन तिथे आता भारतीय संविधान आले आहे. हे दर्शवते की, भारतातील न्याय हा केवळ शक्ती किंवा सत्तेच्या जोरावर नाही, तर घटनात्मक तत्त्वांवर आधारित आहे.

**निष्कर्ष**

आपण विधी क्षेत्राची निवड केवळ श्रीमंत होण्यासाठी केलेली नाही, तर 'कायद्याचे राज्य' हे प्रत्येक सामान्य नागरिकासाठी पहारेकरी म्हणून कार्य करेल हे वचन पूर्ण करण्यासाठी केली आहे. न्यायमूर्तींनी अत्यंत मार्मिक शब्दांत आपली भीती व्यक्त केली:

"The time is not far when premier law schools may be successful in producing intelligent graduates but thinking like robots and not like human beings with the sensitivity they ought to nurture and develop for serving the common man of the society."

(अनुवाद: तो दिवस दूर नाही जेव्हा प्रमुख विधी शाळा बुद्धिमान पदवीधर तयार करण्यात यशस्वी होतील, परंतु ते मानवाप्रमाणे विचार न करता रोबोटप्रमाणे विचार करतील आणि सामान्य माणसाची सेवा करण्यासाठी आवश्यक असलेली संवेदनशीलता त्यांच्याकडे नसेल.)

भारतीय विधी क्षेत्राचे भारतीयीकरण ही केवळ कायदेशीर सुधारणा नसून, ती आपल्या कायदेशीर ओळखीची पुनर्रचना आहे.

**– डॉ. प्रशांत धर्माधिकारी**
सहाय्यक प्राध्यापक
गुजरात केंद्रीय विश्वविद्यालय, वडोदरा

●●●

# कालजयी दिनकर

*हिंदीतील प्रख्यात कवी रामधारी सिंह दिनकर यांचा जन्मदिवस २३ सप्टेंबर रोजी साजरा झाला. या महान कवी बद्दल व त्यांच्या कार्याबद्दल प्रकाश टाकणारा लेख – संपादक*

सदियों की ठंडी बुझी राख सुगबुगा उठी,
मिट्टी सोने का ताज पहन इठलाती है,
दो राह, समय के रथ का घर्घर नाद सुनो,
सिंहासन खाली करो की जनता आती है।

सत्तरच्या दशकात इंदिरा गांधींच्या दडपशाही आणि संपूर्ण देशावर १९७५ सालानंतर तब्बल २१ महिने लादलेल्या आणीबाणीच्या विरोधात जयप्रकाश नारायण यांचे एक देशव्यापी आंदोलन चालू होते. त्या आंदोलनाच्या यज्ञकुंडातून बाहेर पडणारी अग्निशिखा जनमानसात धगधगती ठेवण्याचे काम ज्या कवितेने केले होते ती कविता म्हणजे 'सिंहासन खालि करो की जनता आती है' आणि या क्रांतिकारी कवितेचे उद्गाते आहेत राष्ट्रकवी 'रामधारी सिंग दिनकर' उर्फ 'दिनकर'.

दिनकर हे आजही हिंदी साहित्यातील एक दिग्गज कवी म्हणून ओळखले जातात. ज्यांची ख्याती 'संसद से लेकर सडक तक, और जिल से लेकर जन-जन तक' अशी होती. दिनकरांचा जन्म २३ सप्टेंबर १९०८ सिमरिया (मुंगेर), जे आता बिहार मधील बेगुसराय जिल्ह्यात येते तिथे झाला. दिनकरांचे बालपण फारच हालाखीत गेले. कारण त्यांचे वडील हे दिनकर दोन वर्षांचे असतानाच देवाघरी गेले. दिनकरांची आर्थिक बाजू ही प्रचंड कमकुवत झाली म्हणून त्यांच्या थोरल्या व धाकट्या भावांनी ठरवले की, आपण स्वतः न शिकता मधल्या नुनुवाला (दिनकर) जो हुशार आहे त्याला शिकवू या. शाळेत जाण्यासाठी त्यांना गंगेला ओलांडून जावे लागत असे. एक नावाडी नेहमी दिनकरांना नावेतून शाळेसाठी गंगा पार करवून देत असे. त्याबदल्यात नावाड्याला नुनुवाने रामायण, महाभारतातील गोष्टी किंवा कविता म्हणवून दाखवायच्या ही अट ठरलेली होती. पुढे शिक्षण पूर्ण झाले. घरच्या लोकांची जबाबदारी, भावांचा त्याग, घरातील बहिणींचे भविष्यात लग्न या सर्वांचा गाडा ओढायचा असेल तर नोकरी पत्करावी लागणार आहे हे लवकरच दिनकरांना समजले होते. दिनकरांनी आपल्या जवळजवळ बारा भगिनींचे लग्न लावून दिले! आपण एका मुलीच्या लग्नामुळे थकून जातो!!

१९३५ ते १९४५ मध्ये इंग्रजांच्या काळात त्यांनी एका कॉलेजात निबंधक म्हणून काम पाहिले. ज्या लेखणीमुळे त्यांना ही नोकरी मिळाली होती त्याच दमदार लेखणीमुळे नोकरीच्या काळात कित्येक संकटेही त्यांनी स्वतःहून ओढवून घेतली होती. इंग्रजाकडे अंमलाखाली नोकरी करत असून सुद्धा इंग्रजांविरूद्ध क्रांतिकारक, तिखट कविता ते करत असल्यामुळे त्यांच्या दोन वर्षात तब्बल बावीस वेळा बदल्या झाल्या! कित्येक इंग्रजी अधिकाऱ्यांनी व जवळच्या मित्रांनी त्यांना विचारले की, 'या अशा कविता लिहून कशाला संकटे ओढवून घेत असतोस?' या अशा प्रश्नाला हा महाकवी काय उत्तर देणार! ज्या कवीचा कवितेद्वारे व्यक्त होणे हा काही स्वान्त:सुखाय केलेला उद्योग नव्हता, तर ती त्यांच्या अंतरआत्माची गरज होती! मुळात लेखकांना, कवींना जिवंत ठेवते ती त्यांची लेखणी. मग दिनकर सारखा मूर्तिमंत कवी कसा स्वस्थ बसू शकेल! कवितेच्या अभिव्यक्तीत 'नोकरी' हा मोठा अडसर ठरू लागला होता. पण कौटुंबिक गरजेपोटी नोकरी करणे गरजेचे

होते. शेवटी ज्यावेळी कुटुंबाच्या गरजांचा बोज्या हलका झाला त्यावेळी (१९४५) त्यांनी नोकरीला रामराम ठोकला व फिरून कधी कोणत्याही इंग्रज अधिकाराचा उंबरठा नोकरीसाठी ओलांडला नाही. मग, आता?

निकल पडे कुरुक्षेत्र और,
युद्ध की ललकार सुन प्रतिशोध से
दिप्त हो अभिमान उठता बोल है,
चाहता नस तोडकर बहना लहू
आ स्वयं तलवार जाती हात मे,
रुग्ण होना चाहता कोई नहीं
रोग लेकिन आ गया जब पास हो,
तिक्त औषधी के सिवा उपचार क्या,
शमित नहीं होगा ये मिष्ठांन्न से।

दिनकरांना महाभारतातील कर्ण हा प्रिय होता. याच कर्णावरिल प्रेमापोटी त्यांनी 'रश्मिरथी' हे काव्य लिहिले. रश्मिरथी लिहित असताना दिनकरांचे सर्व कुटुंब त्या रश्मिरथीचे पारायण करायचे. जेव्हा तो काव्यसंग्रह लिहून झाला तेव्हा साधारण दुपारचे तीन वाजले होते. त्यावेळी दिनकर मुजफ्फरपूर मध्ये राहत होते. रश्मिरथीची शेवटची ओळ लिहून ते त्यांच्या खोलीतून बाहेर आले तेव्हा त्यांचे डोळे रक्तबंबाळ झाले की काय इतके ते रडले होते लिहून झाल्यावर! रश्मिरथीच्या प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे महाभारतातील कर्ण या पात्राचा वापर करून तत्कालीन समाज व काळावर दिनकरांनी नेमकं बोट ठेवलं आहे. स्वातंत्र्य तर मिळाले; पण आपल्या देशात समाजातील सर्व लोक स्वतंत्र आहेत का? स्वातंत्र्याच्या पश्चात दलित, पीडितांची झालेली उपेक्षा त्यांना सलू लागली. याच उपेक्षित समाजाचे रूपक असलेलं कर्ण हे पात्र मध्यवर्ती ठेवून दिनकरांनी आपल्या आतील घुसमटिला रश्मिरथी च्या माध्यमातून वाट मोकळी करून दिली. रश्मिरथीत कर्णाच्या मुखातील एक स्वगत आहे –

मै उनका आदर्श, कहीं जो व्यथा न खोल सकेंगे,
पुछेगा जग किन्तू, पिता का नाम न बोल सकेंगे,
जिनका निखिल विश्व में कोई कहीं न अपना होगा,
मन मे लिये उमंग जिन्हे चिरकाल कलपना होगा।

वैयक्तिक मला रश्मिरथी मधील तृतीय सर्गा मधील एक प्रसंग फार आवडतो. श्रीकृष्ण हस्तिनापूरला पांडवांच्यातर्फे शिष्टाईसाठी येतात. त्यावेळी पांडवांच्या वाट्याचे अर्ध राज्य नाही द्यायचे मग किमान पाच गांव तर देशील? दुर्योधन त्यालाही नकार देतो. दिनकरांच्या लेखणीचे तेज, त्यांचे शब्दांवर असलेले प्रभूत्व तृतीय सर्गाच्या काव्याची ध्वन्यात्मकता अनुभवायचे असल्यास तो प्रसंग पुढील दुव्यावर क्लिक करा व आवर्जून ऐका. त्याच सर्गामधील

वर्षों तक वन में घूम घूम,
बाधा-विघ्नों को चूम-चूम,
सह धूप-घाम,पानी पत्थर,
पाण्डव आयें कुछ और निखर।

यानंतरचे कडवे तर हृदयावर कोरून ठेवावे असे आहे.

एक ऐकीव प्रसंग आहे, खरं खोटं माहीत नाही मला. एकदा पं. नेहरू एका कविसंमेलनाला गेले तिथे दिनकरही होते. नेहरू आणि दिनकरांचे ६२ च्या चीन युद्धानंतर फार खटके उडत असत. नेहरू कार्यक्रमाला आले व त्यांचे स्वागत दिनकरांनी केले. दोघे एकत्र मंचावर जाऊ लागले. तेवढ्यात नेहरू अडखळले व त्यांचा तोल जाऊन ते पडणार तेवढ्यात दिनकरांनी त्यांना धरले. त्यानंतर दिनकर जे बोलले ते फार मार्मिक आहे. ते म्हणाले, जब जब राजनीती लडखडायी है, तब तब साहित्यने ही उसे बचाया है। वरील प्रसंग महत्त्वाचा नसून, त्यातले मर्म महत्त्वाचे आहे.

१ डिसेंबर १९७३ रोजी ज्ञानपीठ पुरस्कार

स्वीकारताना दिनकर म्हणतात की, 'देशासाठी केलेला संघर्ष हा मोठा व कुटुंबासाठी केलेला संघर्ष हा छोटा असतो. मी हा छोटा संघर्ष केला आहे. तो करताना जो फावला वेळ मिळाला त्यात त्यामध्ये मी साहित्यसाधना केली आहे. असं असतानाही साहित्य जगताने नजर उचलून माझ्याकडे बघितले हे मी माझे भाग्य समजतो.' दिनकरांची ही किती मोठी इंटेलेक्च्युअल मॉडेस्टी आहे. कवी आणि कवितांच्या भूमिके बद्दल एजरा फ्रॉडरचं वाक्य उद्धृत करताना दिनकर म्हणतात की, 'कविता ही कविता आहे. जसा वृक्ष हा वृक्ष असतो. जसा वृक्ष हा एका जागी स्थिर असतो. तो कुणालाही बोलावत नाही पण तरीही लोक त्याचा हिरवेपणा बघून खूष होतात, त्याच्या सावलीला बसतात, त्याची फळे तोडून खातात. त्याचप्रमाणे मानवी चेतनेच्या तळाला जो आनंद आहे तो कवितेच्या माध्यमातून अभिव्यक्त करणे हीच तर कवीची मोठी उपलब्धी असते.' दिनकरांवर सुरुवातीच्या काळात गुरूदेव रवींद्रनाथ टागोर आणि मोहम्मद इक्बाल यांचा खूप प्रभाव होता. वास्तविक हे दोन्ही कवी अगदी विरूद्ध टोकाचे होते. गुरूदेवांची भूमिका ही ईश्वरासमोर समर्पणाची असायची तर इक्बाल म्हणत की–

खूदी को कर बुलन्द इतना
कि हर तकदिर से पहले
खूद खूदा बंदे से पूछे
बता तेरी रजा क्या है?

अशा दोन टोकांच्या कवींचा एका व्यक्तीवर कसा काय प्रभाव पडू शकतो हा प्रश्न मला नेहमी पडतो? दिनकर म्हणतात माझ्या काव्यलेखनात पहिला भूकंप झाला तो १९४३ मध्ये, जेव्हा माझा परिचय इलियट च्या कवितेसोबत झाला. दिनकर म्हणतात की, 'मला इलियटच्या कविता समजत नसत; पण रवींद्रनाथ आणि इक्बाल वाचून माझ्या मनाच्या शांतीला मात्र भंग करण्यास त्या कविता मात्र पुरेशा होत्या!'

ज्या काव्यनाटक लेखनासाठी दिनकरांना ज्ञानपीठ पुरस्कार (१९७२ चा) मिळाला होता ती कलाकृती म्हणजेच 'उर्वशी'. उर्वशीबद्दल बोलताना दिनकर म्हणतात की, 'आजकाल कविता सत्याचा उद्घोष करत नाही, तर सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न करतात. मी देखील 'उर्वशी' मधून काही शिकवण्यापेक्षा काही शोधण्याचाच प्रयत्न करतो आहे. 'कुरुक्षेत्र' मध्ये प्रकाश आहे, तर 'उर्वशी' मध्ये दुपार आणि संधिप्रकाश आहे. 'कुरुक्षेत्र' मध्ये विश्वास आहे, तर 'उर्वशी' मध्ये संशय आणि द्विधा मन:स्थिती आहे. 'कुरुक्षेत्र' मध्ये धाडसाने गुरयपदावर बोललो आहे, तर 'उर्वशी' मध्ये उर्वशी पदावर पोहोचल्यावर त्याच्या रहस्यांबद्दल विचारलं असतं.' ऋग्वेदात आणि इतर वैदिक वाङ्मयात उर्वशी आणि पुरुवा यांच्या कथेकडे पाहण्याचा वेगळा दृष्टिकोन आपल्याला दिनकर देतात. भारतीय तत्त्वज्ञानाचा 'काम' या प्रेरणेकडे पाहण्याचा किती विशाल, भव्य, उदात्त आणि व्यापक दृष्टिकोन होता हे 'उर्वशी' वाचल्यावरच समजते. पुरुवा हा सनातन नराचे, तर उर्वशी ही सनातन नारीचे प्रतिनिधित्व करते. याची तुलना बायबलच्या ॲडम आणि इव्ह सोबत करून पहा आणि निष्कर्ष स्वतःच काढा. 'काम' याचा अर्थ होतो इच्छा, वासना, कामना, काही मिळवण्याची इच्छा, प्राप्त करण्याची उत्कट अभिलाषा. पण पॉर्नोग्राफीने काम = Sex हे इतक फिट्ट बसवलं आहे ना आपल्या मनात, की त्यापलीकडे काही असतं असा विचारच मनाला शिवायला तयार नाहिये आपल्या. इतकं विकृत करून ठेवलंय आपण 'काम' याला. 'इंद्रियांच्या मार्फत अतींद्रियांना स्पर्श करणे हाच प्रेमाचा आध्यात्मिक महिमा आहे' या गोष्टीवर उर्वशी हे काव्य उभं आहे. उर्वशी वर एक दीर्घ लेख लिहिलाय. करीन कधीतरी त्याला पोस्ट. विज्ञान तंत्रज्ञानाबद्दल दिनकर हे प्रचंड सकारात्मक होते. वैज्ञानिक असूनही कवी, कलाकार असणारे गॅलिलिओ

(पृष्ठ क्र. २० वर)

# ओळख पुस्तकाची

*'तुलनात्मक अभ्यासातून लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा विस्तृत जीवनपट' - संपादक*

आजवर ३५ पुस्तके (८७ आवृत्त्या), ३७०० हून जास्त लेख प्रसिद्ध, ४९०० हून जास्त व्याख्याने, एनएसडीएल, सेबी, मुंबई शेअरबाजार अशा गुंतवणूक क्षेत्रातील नामांकित संस्थांमध्ये ३२ वर्षांहून जास्त काळ उच्चपदस्थ अधिकारी आणि एकूण ४० वर्षे वित्तीय सेवा क्षेत्रात कार्यरत. १९८८ पासून सातत्याने अर्थसंकल्प विश्लेषण. २०२३ साली कै. मा. श्री. नानी पालखीवाला यांचा या आधीचा याबाबतचा विक्रम पार केला आहे. कविता, कथा, ललित, प्रवास वर्णन, गजानन महाराज, गुंतवणूक, आर्थिक, काश्मीर, गुलजार आणि आत्ता लोकमान्य टिळक...अशा वैविध्यतेने लेखन सातत्याने सुरू आहे... हे सारं वाचून आपली दमछाक होते ना...

पण असामान्य बुद्धिमत्ता, सखोल अभ्यास, लेखन क्षमता आणि मुख्य म्हणजे रसाळ वक्तृत्व शैली लाभलेल्या आमच्या डोंबिवलीचे भूषण असलेल्या मा.श्री.चन्द्रशेखर टिळक यांनी लिहिलेले नवीन ताजं कोरकरकरीत आणि अगदी वेगळ्या आशयावरचं पुस्तक नुकतंच प्रकाशित झालं आहे - 'तौलनिक लोकमान्य'

पु. ल., व. पु., प्र. के. अत्रे, सुधा मूर्ती, मीना प्रभू, अच्युत गोडबोले, शिरीष कणेकर, द्वारकानाथ संझगिरी... असे काही निवडक लेखक माझ्या आवडीचे आहेत. मी यांचं साहित्य सातत्याने न कंटाळता अभ्यास म्हणून वाचतो. आणि आता यात भर पडली आहे ती ज्येष्ठ लेखक, कवी, व्याख्याते मा. श्री. चन्द्रशेखर टिळक यांची.

खरंतर शाळेत असताना आपल्याला इतिहास विषयाच्या माध्यमातून परीक्षेच्या अंगाने लोकमान्य बाळ गंगाधर टिळक फारच जुजबी माहीत असतात. चिखली (रत्नागिरी) इथे टिळकांचा जन्म. शेंगांची टरफले, स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे..., मंडाले - गीतारहस्य, सार्वजनिक गणेशोत्सव... वगैरे. यापलीकडे आपण टिळकांबद्दल जवळपास अनभिज्ञ असतो.

चन्द्रशेखर टिळक यांचा आणि लोकमान्य टिळक यांच्याशी तसा काही नातेसंबंध नाही. लेखकाने आपल्या मनोगतात सांगितल्याप्रमाणे, दोघांचे आडनाव एकच असल्यामुळे, कामानिमित्त ते जेव्हा संपूर्ण भारतात भ्रमंती करीत असताना त्यांना शासकीय किंवा खाजगी पातळीवरही लोकमान्य टिळक यांच्याशी काही संबंध होता का? असा प्रश्न वारंवार विचारला जायचा आणि लोकमान्य टिळक आपले आडनाव बंधू आहेत या समान धाग्यातून प्रेरीत होऊन लोकमान्य टिळक यांच्या जीवनावर अभ्यास केला.

आजवर अनेकांनी लोकमान्य टिळक यांच्यावर बरंच काही लिहिलं आहे. पण चंद्रशेखर टिळक यांनी आपल्या 'तौलनिक लोकमान्य' या पुस्तकात आपलं लेखन हे तुलनात्मक पद्धतीने मांडलं आहे. आणि हेच खऱ्या अर्थाने या पुस्तकाचं आणि या लेखकाचं वैशिष्ट्य यामध्ये दिसून येतं.

यापूर्वी होऊन गेलेले आदर्शवत आणि मान्यवर व्यक्ती, किंवा लोकमान्य टिळक यांचे समकालीन किंवा आत्ताचे लोकनेते यांच्या कार्यपद्धती, विचारसरणी, निर्णयक्षमता, नेतृत्वगुण, राजकारण, समाजकारण...

अशा विविध अंगाने तौलनिक माहितीपूर्ण २५ लेख या पुस्तकात समाविष्ट आहे. याशिवाय लोकमान्य टिळक यांच्या जीवनातील घटनाक्रम ही महत्त्वाची माहिती आपल्याला यात मिळते. लोकमान्य टिळक यांच्यावरील इतर पुस्तकांसंबंधी माहिती यात समाविष्ट आहे...

लोकमान्य टिळक आणि इंदिराजी, लोकमान्य टिळक आणि आगरकर, लोकमान्य टिळक आणि स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी, लोकमान्य टिळक आणि सावरकर, लोकमान्य टिळक आणि छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक जीवनातील घटनाक्रम... हे लेख मला स्वत:ला विशेषत्वाने भावले.

वेगळ्या विषयावर, वेगळ्या पद्धतीने केलेली मांडणी ही वाचकांसाठी औत्सुक्याची ठरते. हे पुस्तक वाचताना आपण कुठेही कंटाळत नाही. आपण कोणताही लेख काढून कधीही वाचू शकता. क्रमानेच वाचलं पाहिजे असं कथेसारखं हे पुस्तक नाही. या पुस्तकाच्या माध्यमातून लोकमान्य टिळकांचा संपूर्ण जीवनपट आपल्यासमोर मांडण्यात हा लेखक यशस्वी झाल्याचे दिसून येते. आणि नकळत हा लेखक आपल्या मनात घर करून राहतो. मला खातरी आहे आपण हे पुस्तक वाचल्यावर आपल्याही भावना यापेक्षा वेगळ्या नक्कीच नसतील.

आपण प्रत्येकाने हे पुस्तक विकत घेऊन अवश्य वाचा, संग्रही ठेवा, इतरांना भेट द्या. चंद्रशेखर टिळक सरांच्या आगामी साहित्यासाठी मी शुभेच्छा देतो. निरोगी दीर्घायुष्य प्रार्थितो.

**- श्री. विजय जोशी**
कवी, गझलकार, गीतकार, समीक्षक
डोंबिवली
भ्रमणध्वनी - ९८९२७५२२४२

(पृष्ठ क्र.१८ वरून - **कालजयी दिनकर**)

आणि लिओनार्दो द विंची यांचाही उल्लेख दिनकर आपल्या भाषणात करत असत.

६२ च्या भारत-चीन युद्धात भारताचा झालेला पराभव हा दिनकरांना फार जिव्हारी लागला होता. त्यामुळे भारतीय जनतेचे मेलेल्या, खचलेल्या मनाला जागृत करण्यासाठीचा प्रयत्न त्यांनी 'परशुरामकी प्रतिक्षा' मधून केला. यात 'परशुराम' हे भारताला उद्देशून रुपक आहे. त्या परशुरामाला उद्देशून दिनकर लिहितात की,-


यह उत्तेजित भारत साकार भारत है,
यह और नहीं कोई विशुद्ध भारत है।

दिनकर हे एकमेव हिंदी कवी आहेत, ज्यांनी दक्षिणेतीलही लोकांच्या ह्रदयावर अधिराज्य गाजवले होते. चीन युद्धात झालेल्या पराभवामुळे त्यांना खूप एकाकी वाटू लागले, जणू जीवनातील रसच संपला त्यांचा. आयुष्याच्या शेवटी त्यांनी तिरुपती यात्रा करण्याचा निर्णय घेतला. इकडे देशात जयप्रकाश नारायण यांचे आंदोलन शिखरावर होते. व्यंकटेशाच्या समोर मला रश्मिरथीचे पारायण करायचे आहे ही इच्छा त्यांनी मंदिरातील संबंधित व्यक्तींकडे प्रगट केली. मंदिरात साक्षात रामधारी सिंग दिनकर रश्मिरथीचा पाठ करणार! हा हा म्हणता म्हणता ही वार्ता काही तासांत तिरूमाला परिसरात वाऱ्यासारखी पसरली. काही क्षणांत मंदिर परिसरात चार-पाच हजार लोकांनी गर्दी केली. पण या लोकांना कुठे माहीत होते की, हा पाठ शेवटचा पाठ ठरणार म्हणून. त्यानंतर दिनकरांनी व्यंकटेश्वराला नमस्कार केला व म्हणाले, 'माझी एक इच्छा आहे की, माझे उर्वरित आयुष्य जयप्रकाश नारायण यांना मिळावे!' त्यानंतर दिनकरांनी स्वत:ला समुद्राला स्वाधीन केले. हा शब्दसूर्य कायमचा अस्ताला गेला प्रखर काव्याची शिदोरी मागे सोडून!..

**- अजिंक्य कुलकर्णी**

# शिवचरित्र आणि स्व. गजानन भास्कर मेहेंदळे

*इतिहासाचार्य वि. का. राजवाडे आणि ग. ह. खरे यांच्यासारख्या विद्वानांची परंपरा पुढे नेणारे इतिहास संशोधक, शिवचरित्रकार, तसेच युद्ध इतिहासाचे गाढे अभ्यासक गजानन भास्कर मेहेंदळे. इतिहास हा घटक अतिशय संवेदनशील ठरत असण्याच्या काळात त्यांच्यासारख्या अभ्यासकाचे महत्त्व अधिकच अधोरेखित होते – संपादक*




महाराष्ट्राला पट्टीच्या इतिहास संशोधकांची मोठी परंपरा लाभली आहे. त्यांच्यापैकी एक महान इतिहास संशोधक म्हणजे गजानन भास्कर मेहेंदळे, त्यांनी वयाच्या २२ व्या वर्षी म्हणजे १९६९ मध्ये शिवचरित्राच्या संशोधनाकरिता पुण्यातील भारत इतिहास संशोधक मंडळात पाऊल ठेवले. मेहेंदळे सरांनी प्रदीर्घ संशोधन करून साधारण २५०० पृष्ठांचे 'श्री राजा शिवछत्रपती' हे मराठी शिवचरित्र सिद्ध केले. या ग्रंथात अफजलखानाच्या वधापर्यंतचा इतिहास आला असून, ६८ परिशिष्टे समाविष्ट आहेत. पुढे २०११ मध्ये त्यांनी 'शिवाजी हिज लाइफ ॲण्ड टाइम्स' हे इंग्रजी शिवचरित्र सिद्ध केले. ते पूर्ण असून, साधारण एक हजार पृष्ठांचे आहे.

शिवचरित्रविषयक साधने मराठी, संस्कृत, फार्सी, डिंगल, कन्नड, पोर्तुगीज, इंग्रजी, डच, फ्रेंच या भाषांमध्ये विखुरलेली आहेत. समकालीन विश्वसनीय साधनांवर चरित्र सिद्ध करावयाचे, तर या भाषा अवगत असावयास हव्यात, त्यांचे पुरेसे ज्ञान हवे, या जाणिवेतून मेहेंदळे सरांनी या भाषा आत्मसात केल्या. त्यांनी वेगवेगळ्या संशोधन केंद्रांना भेट देऊन, जसे की, नटनागर शोध संस्थान, सीतामऊ, नॅशनल लायब्ररी, कोलकाता – तेथील साधने अभ्यासली. भरपूर टिपणे तयार झाल्यानंतर सरांनी लेखनास सुरुवात केली. त्यांच्या लेखनाचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे प्रत्येक विधान हे समकालीन आणि त्यातही विश्वसनीय साधनांवर आधारलेले आहे. काही पृष्ठांवर तर मुख्य मजकूर केवळ दोनतीन ओळींचा असून, उरलेला भाग संदर्भांनी व्यापला आहे! एखाद्या विधानास एकापेक्षा अनेक संदर्भ दिले असून, काही ठिकाणी संदर्भाकरिता पुन्हा संदर्भ दिले आहेत! मेहेंदळे सरांच्या लेखनाचे एक साधेपण हे त्यांच्या लेखनाचे मोठेपण आहे, ते म्हणजे एखाद्या घटनेची, मुद्याची, विषयाची माहिती सांगत असताना ते सुसंगत घटनाक्रम सांगत जातात आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट ते अखेरीस सांगतात. त्यामुळे विषय कितीही क्लिष्ट असला, तरी वाचकांच्या मनात गोंधळ निर्माण होत नाही.

सर्व प्रकारच्या कागदपत्रांचा त्यांच्याएवढ्या सूक्ष्मतेने अभ्यास केलेली व्यक्ती भारतात क्वचित एखादी असेल. ते नेहमी सांगत, 'तुम्ही जेवढ्या वेळा छत्रपती शिवाजी महाराजांचे पत्र वाचाल, प्रत्येक वेळी तुम्हाला काही तरी नवीन समजेल, म्हणून ते पुनःपुन्हा वाचा.' कागदपत्रे 'अबोल' असतात, त्यांना आपणास 'बोलके' करावे लागते! ती संदर्भ देतात, पण इतिहास आपणाला सांगावा लागतो. अप्रसिद्ध कागदपत्रे आपली वाट पाहात

असतात! कोणी तरी येईल आणि त्याची दृष्टी आपणावर पडून प्रकाश दाखवेल...




मेहेंदळे सरांनी परिशिष्टांच्या खंडात 'ऐतिहासिक कागदपत्रांच्या खरे-खोटेपणाचे परीक्षण' आणि 'कालगणनेच्या शिवकालीन पद्धती' ही दोन अत्यंत महत्त्वपूर्ण परिशिष्टे सिद्ध केली असून, ती साधारण १५० पृष्ठांमध्ये विखुरलेली आहेत. ही परिशिष्टे म्हणजे त्यांच्या दीर्घकालीन संशोधनाचा परिपाक असून, कोणताही संशोधक या दोन परिशिष्टांचा आधार-संदर्भ घेतल्याशिवाय पुढे जाऊ शकत नाही. इथे दोन उदाहरणे देणे उचित होईल, ज्यामधून ते निरीक्षणे कशी नोंदवीत हे ध्यानात येईल. जसे की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रात दादाजी कोंडदेवांचा उल्लेख नेहमी दादाजी 'कोंडदेउ' असा येतो. तसेच, छत्रपती शिवाजी महाराजांची राज्याभिषेक शकानंतरची जी पत्रे आहेत, त्यांवर राज्याभिषेक शक नेहमी संख्येत घातलेला असतो, शब्दांत नाही.

शब्दांचा अभ्यास किती गरजेचा आहे, हे सरांनी वेगवेगळ्या प्रकारे दाखवून दिले आहे. वाङ्मयात शब्द कसे चालतात, हे त्यांच्या इंग्रजी शिवचरित्रातून ध्यानात येते. विरामचिन्हांमुळे अर्थ कसे बदलतात, याकरिता ते 'पांडा: इट्स शूट्स ॲण्ड लिव्ह' या ग्रंथाचे उदाहरण देत. त्यावरून जगभरात प्रचलित असणाऱ्या संशोधन पद्धती, मॅन्युअल गाइड सांगताना सर म्हणत, 'वाचकांची सुविधा महत्त्वाची आणि यासाठी तुम्ही जी पद्धत अवलंबिता, तीच तुमची 'रिसर्च मेथॉडॉलॉजी'. संशोधनाच्या श्री राजा या टप्प्यावर जाऊन पोहोचण्याकरिता तुमच्याकडे तेवढा प्रचंड आत्मविश्वास हवा.'

फार्सी आणि अरबी शब्दांची दहा-अकरा प्रकारे अनेकवचने होतात, हे सांगताना या भाषांतील शब्द मराठीत कसे आले आणि रुळले हेदेखील सरांनी समजाविले आहे. उदाहरणार्थ, वडील हा 'वालिद' या शब्दाचा मराठी अपभ्रंश असून, 'हक्क' हा अरबी शब्द हिंदीत 'हक' असा होतो, तर मराठीत मूळ रूपात म्हणजे हक्क असाच वापरला जातो. 'कटूबाण', 'महालानिहाये', 'बदअमल' आणि 'महासिद्धी' या शब्दांचे त्यांनी केलेले विवेचन बघण्यासारखे आहे. ते म्हणायचे, 'एखाद्या शब्दाचा अर्थ लावण्यासाठी तो शब्द निदान दोनदा किंवा त्यापेक्षा जास्त ठिकाणी यावयास पाहिजे.' छत्रपती शिवाजी महाराजांच्या दोन वेगवेगळ्या पत्रांत येणाऱ्या 'तोरतरंग' आणि 'वडऊपर' या दोन शब्दांचा अर्थ अजूनही लागलेला नाही.

**राजा छत्रपती**

एखादी भाषा येणे किती गरजेचे आहे याचे उदाहरण देताना सर म्हणत, 'मजकुरातील भाषा तुम्हाला उमगली, तर पूर्ण दालनच उघडेल. नाही तर मग दुसऱ्यांनी केलेल्या भाषांतरावर किंवा अन्य दुय्यम साधनांवर अवलंबून राहावे लागते. मग ती खोटी असोत, वा चुकीची; त्यावरच अवलंबणे भाग पडते.' जगातील उत्कृष्ट इतिहासविषयक वाङ्मय इंग्रजीत लिहिलेले असून, ते समजायचे असेल तर इंग्रजी आली पाहिजे आणि त्या इतिहास संशोधकांच्या पंगतीत जाऊन बसावयाचे असेल तर इंग्रजीवर प्रभुत्व मिळवावयास हवे.' सर या विषयाचे महत्त्व समजाविण्याकरिता दुसऱ्या महायुद्धातील

मूर्खांच्या चर्चेत शहाणपणाच्या गोष्टी करणे म्हणजे मूर्खपणाच असतो!

जपानच्या भूमिकेचे उदाहरण देत. दुसऱ्या महायुद्धाचा अभ्यास करण्यासाठी त्या त्या राष्ट्रांची कागदपत्रे उपलब्ध असून, ती इंग्रजीतही भाषांतरित झाली आहेत. मात्र, जपानची फारशी कागदपत्रे उजेडात आली नसून, ती इंग्रजीतही व्यवस्थित भाषांतरित झालेली नाहीत. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धातील जपानची भूमिका काय होती ते समजत नाही. इतिहास संशोधकास ऐतिहासिक साधनांचा उपयोगही प्रभावीपणे करता आला पाहिजे. उदाहरणार्थ, जदुनाथ सरकारांनी औरंगजेबाच्या चरित्राकरिता 'बादशाहनामा' आणि 'आदाब-ए-आलमगिरी' या साधनांचा उपयोग केला आहे. त्यांच्यानंतर या साधनांचा अधिक प्रभावीपणे उपयोग कोणी केला असेल, तर तो मेहेंदळे सरांनी. जसे की, 'आदाब-ए-आलमगिरी' या पत्रसंग्रहात साधारण ६०० पत्रे असून, त्यातील २७ शिवचरित्रविषयक आहेत. ही पत्रे पहिल्यांदा मेहेंदळे सरांनी संपादित करून लोकांसमोर आणली.

हिंदुस्थानात १७ व्या शतकाचा इतिहास लिहिताना बऱ्याच कळीच्या गोष्टींचा उघड ऊहापोह आणि विवेचन मेहेंदळे सरांनी केले आहे. असे अनेक तपशील आणि बारकाव्यांचे स्पष्ट विवेचन लिहिणारे ते बहुधा पहिलेच इतिहासकार असावेत. उदाहरणार्थ, १६५७ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघलांच्या जुन्नर आणि अहमदनगर (आता अहिल्यानगर) या ठाण्यांवर हल्ले का चढविले? मुघल मनसबदारी व्यवस्था मराठीत समजावून सांगणारे सर पहिले. त्यांनीच ही गोष्ट ध्यानात आणून दिली की, आदिलशाहीत वजीर हे पद होते. असे अनेक वजीर होते आणि सरदार म्हणजे नोबल नव्हे, तर या वजिरांची जी पथके असत त्यांच्या प्रमुखाला सरदार म्हणत.

मेहेंदळे सर हे युद्धशास्त्राचे (मिलिटरी सायन्सचे) अधिकृत पदव्युत्तर विद्यार्थी होते. त्यामुळे इतरांच्या विवेचनात न आलेल्या अनेक महत्त्वपूर्ण गोष्टी इंग्रजी शिवचरित्रात त्यांनी समजावून सांगितल्या. उदाहरणार्थ : 'वॉर ऑफ ॲनिहिलेशन' आणि 'वॉर ऑफ ॲट्रिशन' म्हणजे काय ? छत्रपती शिवाजी महाराजांनी 'फॅबियन स्ट्रॅटेजी' कशी वापरली ? युद्ध काय आहे ? क्लॉझविट्झच्या शब्दांत सांगायचे तर युद्ध हे राजकारणासाठीचे शस्त्र आहे.

वेगवेगळ्या माध्यमांतून धोरणांची मालिका सुरू ठेवण्याचा तो मार्ग आहे. शत्रूला सर्वाथनि नष्ट करणे, हे सर्व युद्धांचे सर्वस्वी ध्येय असते असे नाही. खरे ध्येय काय, तर शत्रू आपल्याला हव्या त्या राजकीय संधीला मान्यता देईल. युद्ध कधी कधी शत्रूची शक्य तेवढी हानी करणे - परंतु नेहमी नव्हे - या उद्दिष्टासाठी उपयुक्त ठरू शकते.

युद्धाच्या तत्त्वांची (प्रिन्सिपल्स ऑफ बॉर) जगभर सातत्याने चर्चा झाली आहे. त्यांची साकल्याने व्यवस्थित मीमांसा केली, ती जे. एफ. सी. फुलर यांनी. त्यांनी युद्धाची सहा तत्त्वे प्रतिपादली आहेत. उद्दिष्टांची निवड आणि ती बाळगण्याचे सातत्य, निकडीची हालचाल आणि गतिमानता, आश्चर्यकारी धक्का, शत्रूचे लक्ष विचलित करणे, स्वयंसुरक्षितता आणि आघाती प्रत्ययाची आक्रमकता. ही सर्व सहा तत्त्वे छत्रपती शिवाजी महाराजांनी वापरली, त्यांनी शत्रूच्या अंतर्गत फळीवर कसा आघात केला, केव्हा केला, याचा उलगडादेखील सरांनी केला.

इतिहासाचा नेमकेपणाने अभ्यास करण्यासाठी संख्याशास्त्राचा अभ्यास करावयास हवा, असे ते नेहमी सांगत. त्यांनी एक गोष्ट समजावली की, खोटे बोलण्यासाठी इतिहासकार संख्याशास्त्राचा आधार घेतात, हे तुम्हाला समजावयाचे असेल, तर संख्याशास्त्र उमगले पाहिजे. उदाहरणार्थ, औरंगजेबाच्या कारकीर्दीच्या दुसऱ्या टप्प्यात (१६७८-१७०७) ज्यांना किमान ५०० किंवा त्यापेक्षा जास्त मनसब आहे अशा हिंदू मनसबदारांचे प्रमाण एकूण मनसबदारांच्या ३१ टक्के असून, यामधून

मराठ्यांचे १८ टक्के हे प्रमाण वजा केले, तर तथाकथित हिंदूंचे प्रमाण १३ टक्क्यांवर येते, आणि हे मराठे औरंगजेबाकडे कायम नसावयाचे, तर येऊन-जाऊन असत. म्हणून या आकडेवारीवरून 'तो सहिष्णू होता', असे अनुमान काढले जाऊ शकत नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांचे नेतृत्वगुण समजाविताना ते नेहमी सांगत, 'धैर्य आणि निष्कलंक चारित्र्य.' याशिवाय इतर असंख्य नेतृत्वगुण त्यांनी इंग्रजी शिवचरित्रात उलगडले आहेत. सतराव्या शतकात स्टेट्समनशिप आणि जनरलशिप ही एकाच व्यक्तीची कार्ये होती. ती ध्यानात घेऊन त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी व्यवस्थांमध्ये ज्या सुधारणा घडवून आणल्या, त्याही स्पष्ट केल्या आहेत. सर सांगत, 'इस्लामी शासकांनी हिंदूंची मंदिरे पाडून त्या जागेवर मशिदी उभारणे, तसेच नंतर त्या पाडून त्याच जागेवर मंदिरांची उभारणी करणे, मुसलमान झालेल्यांना पुन्हा हिंदू करून घेणे; आणि भाषाशुद्धी करणे ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजकीय धारणेतील सूत्रे सातत्याने दिसतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजवटीची ऐतिहासिक समर्पकता कोणती, तर तेव्हा हिंदू धर्म टिकला छत्रपती शिवाजी महाराजांमुळे आणि आज आपण हिंदू आहोत तेदेखील शिवाजी महाराजांमुळेच.'

तरुण इतिहास संशोधकांना आपली मते व्यक्त करू द्यावीत याबाबत सर आग्रही होते. ते म्हणत, मते चुकली तर ती दुरुस्त करता येतील; अर्धी चूक अर्धी बरोबर असतील, तर कारणमीमांसा करता येईल; आणि बरोबर असतील, तर इतिहासात भर पडेल.

पुण्यातील भारत इतिहास संशोधक मंडळाशी सरांचे ५० वर्षांहून अधिक काळ ऋणानुबंध राहिले. मंडळाशिवाय शिवचरित्र संशोधन पूर्ण होऊ शकत नाही. मंडळातील महान इतिहास संशोधक डॉ. ग. ह. खरे (तात्या) हे सरांचे गुरू, त्यांचा सरांच्या संशोधनावर मोठा प्रभाव होता. असेच अजून एक महान इतिहास संशोधक रोमेशचंद्र उर्फ आर. सी. मुजुमदार यांचा सरांच्या संशोधनावर मोठा प्रभाव राहिला. इतिहास संशोधकाचे कार्य काय असावयास हवे हे समजाविताना मेहेंदळे सर आर. सी. मुजुमदारांचा पुढील उतारा उद्धृत करीत.-

'इतिहासकाराने सत्य सांगण्यापासून परावृत्त होता कामा नये, उलट ते धैर्याने मांडणे हीच त्याची खरी जबाबदारी आहे. इतिहास हा कोणाच्याही मान-अपमानासाठी नसून, विश्वसनीय संदर्भातून उलगडणाऱ्या सत्याचा प्रामाणिक शोध आहे. अज्ञान दीर्घ काळ टिकणारे नसते, म्हणून समस्यांचे निराकरण वास्तव घटनांचे संपूर्ण ज्ञान घेऊनच शक्य होते. इतिहासकाराने पक्षपात, राग-द्वेष वा राजकीय विचार बाजूला ठेवून, कालचक्राप्रमाणे नव्हे, तर सदैव सत्याच्या दिशेने निर्भीड वाटचाल करावी; कारण त्याचे एकमेव ध्येय म्हणजे सत्याचा शोध.'

डॉ. सुरेंद्रनाथ सेन यांनी आपला संपादित ग्रंथ 'फॉरिन बायोग्राफीज ऑफ शिवाजी'च्या प्रस्तावनेत म्हटले आहे: 'इतिहासलेखन व्यक्तीच्या किंवा पारंपरिक धारणांच्या आधारावर अवलंबून नसावे. ती व्यक्ती वा परंपरा कितीही बलाढ्य वा थोर असो. इतिहासलेखन त्याला आधारभूत असणाऱ्या संदर्भस्रोतावर विसंबले पाहिजे. हे तर इतिहासलेखानाचे गृहीत आधारभूत तत्त्व आहे.' मेहेंदळे सरांचे इतिहासलेखन या तत्त्वाचा धगधगता जिवंत नमुना आहे. या तत्त्वाला प्रमाण मानून इतिहास संशोधनाची अखंड साधना करीत राहणे हीच मेहेंदळे सरांना खरी श्रद्धांजली ठरेल.

**- डॉ. केदार फाळके**

लेखक शिवचरित्रकार आणि ज्येष्ठ इतिहास संशोधक गजानन भास्कर मेहेंदळे यांचे विद्यार्थी आहेत.

•••

# रत्नाकर मतकरींच्या कथा 'जौळ' आणि 'इन्व्हेस्टमेंट!'

*ज्येष्ठ लेखक रत्नाकर मतकरींच्या 'न वाचवल्या जाणाऱ्या पण वाचायलाच हव्यात अशा' कथा. 'जौळ' आणि 'इन्व्हेस्टमेंट!' याचे पुस्तक परीक्षण - संपादक*

पुलंना विनोदी लेखक म्हणणं जितकं चुकीचं आहे; तितकंच चुकीचं आहे रत्नाकर मतकरींना गूढ कथाकार संबोधणं. मतकरींनी बालसाहित्य/नाट्य विषयात विपुल लेखन तर केलेलं आहेच; पण सामाजिक, वैचारिक विषयही त्यांनी कथा, कादंबऱ्या, दीर्घ लेख अशा विविध मार्गांनी सक्षमपणे हाताळले आहेत. गेल्या आठवड्यात मतकरींच्या अशाच दोन सर्वोत्कृष्ट म्हणाव्यात अशा कलाकृती वाचनात आल्या. 'जौळ' आणि 'इन्व्हेस्टमेंट'.

जौळची प्रकटनशैली फार वेगळी आहे. ही एका सर्वसामान्य घरातली कथा आहे. कादंबरीत भरपूर पात्रं आहेत ज्यांची अगदी जेमतेम तोंडओळख करून दिली जाते किंवा अनेकांचा तर एक-दोनदा केवळ निसटता उल्लेख येतो. या एवढ्या पात्रांमधल्या काही निवडक आणि कथेच्या दृष्टीने महत्त्वाच्या पात्रांच्या दृष्टिकोनात्मक निवेदनातून कथा पुढे सरकत जाते. निवेदक कोण आहे हे सांगितलं जात नाही. पण केवळ पहिल्या किंवा फार तर दुसऱ्या ओळीत हे पात्र कोण आहे ते चटकन लक्षात येतं ही मतकरींच्या लेखनाची खरी जादू आहे! घटनांमधून पात्रांचा परिचय अगदी थोडक्यात करून दिला जात असतानाच पात्रांच्या स्वभावाची ओळख तर वाचकाला होतेच, पण त्याचबरोबर कथेची वीणही घट्ट बांधली जाते. आपण अतिशय बांधीव पटकथा वाचतोय असं जाणवत राहते. जौळ १९८७ साली प्रकाशित झाली आहे हे लक्षात घेता ही निवेदनशैली किती आगळीवेगळी आहे हे जाणवून वाचक पानापानांवर थक्क होता जातो. अशी निवेदनशैली शिवाजी सावंतांनी मृत्युंजय मध्ये वापरली होती. परंतु तो विषय पौराणिक आणि त्यातील पात्रांची निवेदनं विशाल आहेत. उलट जौळचा विषय सामाजिक, कौटुंबिक तर आहेच आणि प्रत्येक पात्राची निवेदनं अतिशय लहान अर्थात जेमतेम दीड-दोन पानी आहेत.

कथा/शेवट माहीत असूनही पुढे काय होणार याची एवढी हुरहूर मला आत्तापर्यंत (कथा माहीत असणाऱ्या) इतर पुस्तकांच्या बाबतीतही कधीच वाटली नव्हती. पुस्तकाच्या मध्यावर शेवटच्या भयंकर घटनेचं बीज रोवलं जाण्याचे अस्फुट उल्लेख यायला लागतात तेव्हा अक्षरशः धडधडायला लागतं आणि प्रचंड वाईटही वाटायला लागतं. हे सगळं अशा विचित्र दिशेने का जातंय? याला थांबवण्याचा प्रयत्न कोणीच का करत नाहीये? प्रत्यक्षात हे असं घडू शकतं? जेमतेम चार महिन्यांच्या संसारात एवढे टोकाचे आणि परतीचे दोर कायमस्वरूपी कापण्याचे निर्णय घेण्याएवढी उलथापालथ होऊ शकते? जीवाला कणभरही किंमत नसावी? कशाचा कशाशी ताळमेळच बसत नाही.

अर्थात वाचकांना कादंबरी वाचताना पडू शकणाऱ्या या आणि अशा असंख्य प्रश्नांची उत्तरं लेखकाने पुस्तकाच्या सुरुवातीला मनोगतात दिली आहेत. या कादंबरी विषयी आपली भूमिका मांडताना मतकरी सुरुवातीलाच म्हणतात की, 'ही कादंबरी एका सत्यघटनेवर आधारित आहे.' आणि आवर्जून हा उल्लेख करण्याचं कारण एवढंच की, कादंबरी पूर्णतः काल्पनिक

असती तर त्यांनी कथेत अनेक बदल केले असते, जेणेकरून पात्रांच्या विचित्र वागण्याला एक किमान सुसंगती येऊ शकली असती, त्यांच्या विक्षिप्त प्रतिक्रिया किमान तार्किक वाटल्या असत्या. फार मोठी कारणं नसतानाही काल्पनिक सुखाच्या शोधात माणसं अतिशय असंबद्ध, अतर्क्य वागून फार घातक निर्णय घेतात आणि उलट दुःखाच्या अजून अजून खोल गर्तेत जातात.

'जौळ' किमान पंचवीसेक वर्षांपूर्वी वाचनालयातून आणून वाचली होती. तेव्हा मतकरींचे सलग १०-१२ कथासंग्रह झपाटल्यागत वाचले होते. त्या प्रवासात मी मतकरींचं वाचलेलं हे तिसरं किंवा चौथं पुस्तक होतं. या कादंबरीतल्या प्रत्येक पात्राची निवेदनाची पद्धत, हळूहळू डोकावत जाणारे विसंवादी सूर वाचताना हादरून गेलो होतो. मुख्य म्हणजे ही कादंबरी डोंबिवलीत घडलेल्या एका शोकांतिकेवर आधारित असल्याने अजूनच कनेक्ट झालो होतो. तेव्हा पुस्तक विकत घेऊन वाचण्याची ऐपत नव्हती. जेव्हा ती आली त्याच्या फार आधीच जौळ आऊट ऑफ प्रिंट झाली होती. गेल्या वर्षी ती पुन्हा उपलब्ध झाल्याचं वाचून घ्यायचं नक्की ठरवलं होतंच.

या सत्यघटनेवर आणि कादंबरीवर नंतर 'माझं काय चुकलं?' हे नाटक आणि 'माझं घर, माझा संसार' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता.

अर्थात जौळ यावेळी पुन्हा वाचताना पुनःप्रत्ययाचा आनंद मिळाला असं म्हणू शकणार नाही! उलट जौळ वाचताना वेदना, हतबलता, रिक्तपणा अशा सगळ्या भावनांचा एकत्रित कल्लोळ जाणवत राहतो याच्याशी जौळ वाचलेली कुठलीही व्यक्ती सहमत होईल!

रत्नाकर मतकरींच्या 'इन्व्हेस्टमेंट' या कथेवर आधारित त्याच नावाच्या चित्रपटाला २०१२ साली सर्वोत्कृष्ट चित्रपटाचं पारितोषिक देऊन गौरवण्यात आलं होतं. चित्रपट दिग्दर्शनाचा हा मतकरींचा पहिलाच प्रयत्न होता ही विशेष उल्लेखनीय बाब! इन्व्हेस्टमेंट या कथासंग्रहात शीर्षककथेव्यतिरिक्त अन्य सात कथा असून, त्या २००० च्या पहिल्या दशकात निरनिराळ्या मासिकांमध्ये प्रकाशित झाल्या होत्या.

सामाजिक विषयावर बेतलेल्या यातल्या सर्व कथांमध्ये एक सामायिक गडदपणा आढळतो. पैसे, चैन, ऐशोआराम अशा भौतिक सुखांना सर्वस्व मानून नीतिमूल्यांना पायदळी तुडवण्यात नेत्यांपासून ते कारखानदारांपर्यंत आणि पोलिसांपासून ते सामान्य माणसापर्यंत सर्वांची जी एक जीवघेणी स्पर्धा चालू आहे त्यात कोणीही जिंकलं तरी अंतिम हार ही समाजाचीच होणार आहे हे तत्त्व प्रत्येक कथा वाचताना जाणवत राहतं. नाही म्हणायला प्रत्येक कथेत संस्कार, सामाजिक जाणिवा, चांगुलपणा शिल्लक असणारी एखाद-दोन पात्रं आहेत, परंतु विरोधी पात्रांच्या भाऊगर्दीत अशा लोकांच्या प्रतिकाराचा काय चोळामोळा होऊन जातो हे वाचून फारसं आश्चर्य वाटत नसलं तरीही नैराश्य मात्र येतंच.

इन्व्हेस्टमेंट ही कथा मी काही वर्षांपूर्वी पहिल्यांदा वाचली, त्या आधी त्यावर आधारित चित्रपट बघितला होता. तो प्रचंड आवडला होता. कथेतले पालक, विशेषतः आई ही चंगळवाद, श्रीमंतीच्या हव्यासाने पछाडलेली आहे. उच्च मध्यमवर्गीय शैलीचं अतिसुखी जीवन जगात असतानाही तिची 'अजून' ची हाव मिटत नाही आणि त्यापायी संस्कारक्षम वयातल्या मुलावर सुख ओरबाडून घेण्याचे संस्कार केले जातात. आणि विशेष म्हणजे कोणालाही त्याबद्दल काहीही वाटत नाही. कथेचा शेवट आणि त्यातही अखेरचं वाक्य एवढं भयंकर धक्का देणारं आहे की, कथा संपल्यावरही दीर्घ काळ वाचक त्या धक्क्याचा अनुभव घेत राहतो! (चित्रपटाचा शेवट किंचित बदललेला आहे).

---

फक्त जिंकणाराच नाही, तर कुठं हरावं हे कळणारा सुद्धा महान असतो!

नंतरच्या कथेत एक ध्येयमार्गी, सच्छिल पण कणखर लेखक आणि त्याच लेखकाकडून चरित्र लिहून घ्यायचा अट्टहास बाळगणाऱ्या, सर्व प्रकारच्या गैरकृत्यांत गुंतलेल्या एका स्थानिक नेत्याची जुगलबंदी आहे. अखेरीस सन्मार्गाचा विजय होणार असं वाटत असे असेपर्यंत लेखक पुस्तकातलया आदर्श जगातला शेवट बाजूला सारून खऱ्या आयुष्यातला शेवट दाखवून कथा संपवतो आणि वाचकाची अखेरची आशाही मावळते!

पुढच्या कथेत स्वतःच्या बायकोला स्वतःची मालकी वस्तू असल्यागत जपणारा, मात्र रस्त्याने जाणाऱ्या प्रत्येक स्त्रीकडे केवळ 'मादी' म्हणून बघणारा एक विकृत इसम, तर त्यानंतरच्या कथेत गैरकृत्य करता करता अचानक सदसद्विवेकबुद्धी जागृत झालेला बालगुन्हेगार अशी दोन सर्वस्वी विभिन्न व्यक्तिमत्त्वं वाचकांच्या भेटीस येतात. दोन्ही कथांमध्ये अगदी शेवटच्या क्षणापर्यंत काय होईल याची धाकधूक वाचकांना वाटत राहते. त्यानंतरच्या, 'फॅक्टरी' हे अतिशय सुयोग्य नाव असलेल्या, कथेत मानव हा वाट्टेल त्या पातळीवर उतरून कुठलीही घृणास्पद कृत्यं पापणीही न लववता कशी सहजगत्या करू शकतो ते वाचून अंगावर काटा उभा राहतो. मुलींचा अनाथाश्रम, त्यात चालणारी गैरकृत्यं, स्थानिक नेता, त्याचे कुटुंबीय, सज्जन भासणारे संस्थाचालक इत्यादी सर्वजण ही पापाची फॅक्टरी बिनबोभाटपणे चालवत राहतात आणि या अन्यायी वर्तुळाला छेद देण्याचा प्रयत्न करण्याचा प्रयत्न करणाऱ्या सज्जन व्यक्तीचं जगणं नकोसं करून टाकलं जातं!

पुढच्या कथांमध्ये शिक्षणक्षेत्र आणि राजकीय क्षेत्र हातात हात घालून चालायला लागलं की किती गलिच्छ प्रकार अगदी सहजरित्या, ताठ मानेने घडवता येऊ शकतात आणि त्याबद्दल कोणालाच कशी कणभरही खंत-खेद वाटत नाही याबद्दलची हतबल करून टाकणारी वर्णनं आहेत. प्रत्येक वेळी सदसद्विवेकबुद्धी जागृत असलेला एखादा क्षीण आवाज बंडखोरी करण्याचा प्रयत्न करतो, पण तो शिताफीने तिथल्या तिथे दडपून टाकला जातो. जवळपास प्रत्येक कथेत थोड्याफार फरकाने घडणारा हा प्रकार, आवाज दाबून टाकल्या गेलेल्या व्यक्तीचं नरकासम होणारं पुढचं आयुष्य, कुठल्याही प्रकारच्या लाजा न बाळगता बिनबोभाटपणे चालू राहणारं पापी वर्तुळ वाचून वाचून चांगुलपणावरचा विश्वासच उडून गेल्यासारखा होतो.

जौळ असो की इन्व्हेस्टमेंट, दोन्ही वाचत असताना वाचकाच्या अंतर्मनात एकच विचार वारंवार येत राहतो की, हे व्हायला नकोय! हे असं का होतंय? हे थांबवा कोणीतरी! यांना आवरा कोणीतरी! पण दुर्दैवाने तसं होत नाही. जे व्हायला नको तेच होतं आणि अखेरीस शेवटच्या पानाशी आल्यावर वाचक निराश होऊन, अपार खिन्नतेने पुस्तक मिटून टाकतो. मतकरींच्या कथा गूढ असतात, विनोदी असतात, सामाजिक असतात पण या दोन पुस्तकांमधल्या कथा (आणि कादंबरी) ही न वाचवल्या जाणाऱ्या प्रकारच्या आहेत.... न वाचवल्या जाणाऱ्या पण वाचायलाच हव्यात अशा; आपल्या उद्यासाठी.. !

**- हेरंब ओक**
ज्येष्ठ लेखक
पुणे

दिशा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

# मी अनुभवलेले विज्ञान भारतीचे ७ वे अधिवेशन, वाराणशी

*विज्ञान भारतीच्या ७व्या अधिवेशनात काय, काय झाले याविषयी माहिती सांगणारा हा लेख. - संपादक*

विज्ञान भारती (विभा) हे देशातील मोठे विज्ञान जनआंदोलन असून, विज्ञानाचे भारतीय दृष्टिकोनातून समाजाभिमुखीकरण, विज्ञान प्रसार आणि राष्ट्रनिर्माणासाठी वैज्ञानिक शक्तीचे संघटन हे संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

त्या अनुषंगाने १३-१४ जून २०२६ रोजी काशी हिंदू विद्यापीठ (BHU), वाराणसी येथे सातवे राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करण्यात आले. सुमारे १२०० हून अधिक वैज्ञानिक, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, उद्योग प्रतिनिधी, धोरणकर्ते, विद्यार्थी आणि विज्ञान भारतीचे कार्यकर्ते या अधिवेशनात सहभागी झाले.

या अधिवेशनाची सूचना मला प्राप्त झाली, त्यात कार्यकारणी सदस्यांचा समावेश होता, पण नागपूरचे ईटणकर सर आणि सातफळे सरानी आवेदन भरण्यास सांगितल्याने मी भरले. बरेच दिवस काहीच झाले नाही. मग एका ग्रुपमध्ये मला ॲड केलं गेलं त्यात admin पोस्ट करू शकत होते. ग्रुपचे सदस्य वाढत होते. मग गुगल फॉर्म आला तो भरला आणि काही दिवस गेल्यावर आणखीन फॉर्म ज्यात जाण्या-येण्याचे साधन, दिवस, थांबण्याचा काळ अशी माहिती होती.. आणि काही दिवसांनी सविस्तर एक्सेल शीट ज्यात प्रत्येकाचे नाव, त्यांचे राहण्याची व्यवस्था त्या त्या ठिकाणच्या कार्यकर्ता प्रमुखाचे दूरध्वनी आणि याशिवाय व्यवस्था प्रमुखांचे नाव साधारण तीन-तीन म्हणजे यातायात प्रमुख, निवास व्यवस्था प्रमुख आणि हे सगळे फोन पूर्ण वेळ उपलब्ध होते. अकोल्यावरून आम्ही पाच जण होतो. अमित सबनीस, नरेंद्र पाठक, नीतिन ओक, वैजयंती पाठक आणि पल्लवी सबनीस.

वाराणशी स्टेशनला पोहोचलो. आमची निवास व्यवस्था तीन वेगवेगळ्या ठिकाणी होती. स्टेशन वर यातायात कार्यकर्ते होते त्यांनी लगेच आमच्या जवळचे सामान घेतले, आमची निवास व्यवस्था कुठे आहे ते पाहिले. बसायला जागा दिली. आणि वाहन येताच आम्हाला रवाना केले. आम्ही मुक्कामी पोहोचलो. लगेच थोड्या वेळात वाहनाद्वारे आम्हाला बनारस हिंदू महाविद्यालयाच्या आवारात (आवार कसले एक छोटे गावच होते ते) संपूर्ण भारतातून साधारण १२०० लोकांचा सहभाग अधिवेशनात होता. वापस मुक्कामी गेल्यावर आम्हाला एक फॉर्म दिला तो दुसऱ्या दिवशी भरून आणायचा होता म्हणजे आम्हाला प्रवेश आणि कीट मिळणार होती. दोन दिवस विभा !!, त्याचे कार्य कसे चालते? कशी संघटना मोठी करायची?, तुमच्याकडून अपेक्षा वगैरे वगैरे मुद्दे राहतील या विचारात होतो. छान जेवणानंतर झोप केव्हा लागली कळलेच नाही.

दुसरा दिवस सकाळी साडे-सात वाजता तयार होऊन फटकाजवळ पोहोचलो. आमच्या 'यात्री निवास' या निवास ठिकाणी पश्चिम बंगाल आणि विदर्भाचे लोक होते. नागपूरचे पांडे सर, मिलिंद ठोकळ, गिरीश



जोशी, गोविंद देहडकर, उमाकांत इंगळे, तेलंग सर वेस्ट बंगालच्या लोकांशी ओळख करून घेईपर्यंत बस निघाली. अधिवेशन स्थानी पोहोचली. बंदोबस्त चोख होता. मुख्यमंत्री येणार होते. नोंदणी विभाग विखुरलेला होता. प्रत्येक ठिकाणी दोन तीन प्रांतांची नोंदणी होती. त्यामुळे कोणताही गोंधळ न होता नोंदणी झाली. कीटचे वितरण दुसरीकडे होते. कीटमध्ये काशी विश्वेश्वरच्या देवळाची प्रतिकृती, वही, पेन, खाण्याचे तारीखवार कूपन आणि वितरानदरम्यान खूप खूप आदर. कूपन घेऊन आम्ही अन्नपूर्णा भवनात गेलो तिथे जेवण, नास्ता, चहा आदिची व्यवस्था होती. स्वतंत्रता सभागृहात कार्यक्रम होता.

अधिवेशनाचा मुख्य विषय होता -

**विकसित भारत २०४७ च्या दिशेने विज्ञान, तंत्रज्ञान, नवोपक्रम आणि भारतीय ज्ञानपरंपरेचा समन्वय.**

उद्घाटन समरोहाचे सूत्र संचालन अत्यंत सुंदर हिन्दी भाषेत डॉ. अरविन्द रानडे यांनी केले. यथायोग्य अतिथी मंचावर होते. जे उपरणे आलेल्या सगळ्या सहभागी सदस्यांना दिले होते तेच देऊन पाहुण्यांचे स्वागत केले आणि विज्ञानात सर्व सामान असतात याची प्रचिती दिली. मा. योगी आदित्यनाथ उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री, यांनी अत्यंत सोप्या सुंदर भाषेत सांगितले.

विज्ञानाचा मूलभूत उद्देश लोककल्याण आहे, संशोधन केवळ शोधनिबंधापुरते मर्यादित न राहता समाजजीवन बदलणारे असावे. भारतातील कृषी, आरोग्य, उद्योग आणि सूक्ष्म, लघू आणि मध्यम क्षेत्रांना विज्ञानाची जोड आवश्यक आहे. त्यांनी यावर भर देऊन सोदाहरण सांगितले वैज्ञानिक दृष्टी स्वीकारणारे राष्ट्र वेगाने विकसित होतात. मात्र केवळ आधुनिक विज्ञान नैतिक अध:पतन घडवते त्यामुळे भारतीय परंपरा आणि आधुनिक विज्ञान यांचा समन्वय घडवणे ही काळाची गरज आहे. विकसित भारताच्या निर्मितीत वैज्ञानिक समाजाने नेतृत्व करावे.




(हे मुद्दे मला भावले आणि समजले ते आहेत. त्यांच्या भाषणाचे रेकॉर्डिंग ऐकून त्याचा अहवाल असल्याचा माझा दावा नाही)

याशिवाय सुनीलजी आंबेकर, वैद्य राजेश कोटेचा, डॉ. शेखर मांडे, डॉ. अमित पात्रा, डॉ. शिवकुमार शर्मा, आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

यानंतर लगेच सुनीलजी आंबेकर यांनी विज्ञान भरतीची सुरवात आणि पुढील आव्हाने याबद्दल अत्यंत सखोल आणि विस्तृत विवेचन केले. संपूर्ण सभागृह भारावले असताना छोटा विश्राम झाला. गर्दीमध्ये फारसा फरक न होता पुढील प्रथम सत्र सुरू झाले

**सायन्स तंत्रज्ञान आणि नवोपक्रम (STI)**

प्रमुख मार्गदर्शक होते डॉ. अविनाश चंद्र पांडे डायरेक्टर इंटर युनिवर्सिटी ॲक्सलरेटर सेंटर यांच्या बोलण्यातील प्रमुख मुद्दे

'विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोपक्रम (STI) हे केवळ ज्ञाननिर्मितीचे साधन नसून राष्ट्रनिर्मितीचे सर्वात प्रभावी माध्यम आहे. भारताला विकसित राष्ट्र बनवायचे असेल, तर आपल्या तरुणांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनाची वृत्ती आणि नवोपक्रमाची क्षमता विकसित करणे आवश्यक

जेव्हा तुम्ही कठीण परिश्रम करण्यास सुरुवात कराल, तेव्हाच तुमचं आयुष्य सोपं होईल.

आहे.' वैज्ञानिक दृष्टिकोन हा समाजाच्या प्रगतीचा पाया आहे. विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारणे, निरीक्षण करणे आणि प्रयोगातून शिकणे आवश्यक आहे. विज्ञान हे केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित नसून, जीवनातील समस्यांचे समाधान शोधण्याचे साधन आहे. मूलभूत संशोधनातूनच भविष्यातील तंत्रज्ञान जन्माला येते. विद्यापीठे, संशोधन संस्था आणि उद्योग यांच्यातील सहकार्य वाढविणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांनी 'ज्ञान घेणारे' न राहता ज्ञान निर्माण करणारे बनले पाहिजे. IUAC सारख्या राष्ट्रीय संशोधन केंद्रांची स्थापना याच उद्देशाने झाली आहे की, विद्यापीठांतील विद्यार्थी व संशोधकांना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात. मोठ्या संशोधन उपकरणांचा लाभ सर्व विद्यापीठांना मिळाला पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), नॅनोतंत्रज्ञान, अवकाश विज्ञान, ऊर्जा आणि पर्यावरण यांसारख्या क्षेत्रांमध्ये मोठ्या संधी आहेत. अपयशाची भीती न बाळगता प्रयोगशील वृत्ती जोपासा. भारताच्या आत्मनिर्भरतेसाठी स्वदेशी तंत्रज्ञान विकास आवश्यक आहे. संशोधनाचे रूपांतर समाजोपयोगी तंत्रज्ञानात झाले पाहिजे. विज्ञानाचा उपयोग शेती, आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरण या क्षेत्रांतील समस्यांचे निराकरण करण्यासाठी व्हावा.

'STI कार्यक्रमाचे खरे यश तेव्हाच आहे जेव्हा विद्यार्थ्यांच्या मनात जिज्ञासा निर्माण होते, संशोधनाची प्रेरणा मिळते आणि ते समाजाच्या विकासासाठी विज्ञानाचा उपयोग करण्यास सज्ज होतात. भारताचा वैज्ञानिक भविष्यकाळ आपल्या तरुणांच्या कल्पकतेत आणि नवोपक्रमक्षमतेत दडलेला आहे.'



(हे मुद्दे मला भावले आणि समजले ते आहेत. त्यांच्या भाषणाचे रेकॉर्डिंग ऐकून त्याचा अहवाल असल्याचा माझा दावा नाही)

यानंतर आम्ही सगळे अन्नपूर्णा मंडपाकडे निघालो. सुंदर जेवण जेवताना उद्घाटन आणि इतर सत्रचर्चा असा छान कार्यक्रम झाला.

पुढील सत्र होते –

**One Health**



**यात प्रमुख मार्गदर्शक होते डॉ. बी. एन. गंगाधर माजी डायरेक्टर नॅशनल इंस्टीट्यूट ऑफ मेंटल हेल्थ अँड न्यूरो सायन्स एवं नॅशनल मेडिकल काऊंसिल के चेअर पर्सन त्यांच्या सोबत पॅनल मध्ये डॉ. भूषण पटवर्धन, प्रोफेसर रॉय, सौरभ सिंग ट्रॅमा सेंटर आयआयटी बी. एच. यू. आणि मॉडरेटर मनोज नेसारी**

सत्रातील वेगवेगळ्या मान्यवरांनी मांडलेले प्रमुख मुद्दे :

Mbbs च्या चार वर्षात मेंदूशी नीट ओळख झाली नाही म्हणून गंगाधर सरानी तो विषय निवडला आणि नंतर जाणवले मानव, प्राणी आणि पर्यावरण यांचे आरोग्य परस्परावलंबी आहे.संसर्गजन्य रोग, पर्यावरणीय बदल आणि सार्वजनिक आरोग्य यांचा एकत्रित विचार आवश्यक. आरोग्य धोरणे बहुविद्याशाखीय असावीत.

ग्रामीण भारतातील आरोग्य व्यवस्थेला विज्ञानाधारित बळकटी देण्याची गरज. वैद्यक शास्त्र

शिकताना प्रथम वर्षात सर्व शाखांची ओळख व्हावी. पुढे त्याला ठरवू द्यावे. थोडक्यात वेगवेगळ्या शाखांमध्ये सीमा कडव्या नसाव्या. (वैद्यक हा विषय १० वी पासून दूर केलेला, त्यामुळे काही तांत्रिक मुद्दे समजले नाही. आयुर्वेदानुसार त्रिदोष पद्धती तर युरोपियन चिकित्सा पद्धतीनुसार विषाणू जन्य अथवा अंतर्गत दोषांमुळे येणारे विकार यांची सांगड कशी मांडणार असे प्रश्न होते पण चर्चेला वेळ नसल्याने अनुत्तरित राहिले.)

**Net Zero for Viksit Bharat**

पुढील सत्र अध्यक्ष – मनु श्रीवास्तव, प्रधान सचिव, ऊर्जा आणि नवीन व नवीकरणीय ऊर्जा विभाग, मध्य प्रदेश शासन इतर सहभागी सदस्य प्रा. डी. पी. सिंग यूजीसी प्रमुख (माजी), डॉ. बी. वेंकेटरमण डायरेक्टर (माजी) IGCAR, डॉ. भास्कर डायरेक्टर CSIR-AMPRI, डॉ. महेश देशपांडे DS Group Director, BARC, DAE आणि मॉडरेटर होत्या डॉ. ठाकूर उपकुलगुरू UTU

थोडक्यात या सत्रात वैज्ञानिक, धोरणकर्ते, उद्योगक्षेत्रातील तज्ज्ञ आणि प्रशासकीय अधिकारी सहभागी झाले होते. चर्चेचा उद्देश विकसित भारताच्या दृष्टीने पर्यावरणीय शाश्वतता आणि आर्थिक विकास यांचा समतोल कसा साधायचा यावर होता.




चर्चेतील प्रमुख मुद्दे :

ऊर्जा संक्रमण : कोळसा, पेट्रोलियम यांसारख्या जीवाश्म इंधनांवरील अवलंबित्व कमी करणे. सौर, पवन, जलविद्युत आणि हरित हायड्रोजन यांचा वापर वाढवणे. ऊर्जेचा कार्यक्षम वापर करणे. आर्थिक विकास थांबवून नव्हे तर हरित तंत्रज्ञानाच्या मदतीने विकास साधणे. उद्योग, वाहतूक आणि शहरीकरण अधिक पर्यावरणपूरक करणे. भारताची लोकसंख्या, ग्रामीण रचना आणि विकासाच्या गरजा लक्षात घेऊन नेट झिरोचा मार्ग आखणे. पाश्चिमात्य मॉडेलची अंधानुकरण न करता भारतीय परिस्थितीला अनुरूप उपाय शोधणे. कार्बन कॅप्चर, ऊर्जा संचयन (battery storage), स्मार्ट ग्रीड आणि स्वच्छ तंत्रज्ञान यांवर भर देणे. भर देऊन सांगितले ते म्हणजे जीवनशैलीतील बदल पाणी, वीज, इंधन यांचा संयमी वापर. वृक्षारोपण आणि स्थानिक संसाधनांचे संवर्धन. विकसित भारत २०४७ च्या ध्येयाला शाश्वत आधार देणे. 'नेट झिरो' म्हणजे विकास आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष नव्हे, तर विज्ञान, तंत्रज्ञान, भारतीय जीवनमूल्ये आणि जबाबदार जीवनशैली यांच्या साहाय्याने शाश्वत विकासाचा मार्ग शोधणे. विज्ञान भारतीच्या अधिवेशनात याच दृष्टीकोनावर विशेष भर देण्यात आला.

या सत्रानंतर एका खुल्या व्याखानाचे आयोजन केले होते. डॉ. राजीव कुमार नीती आयोगाचे माजी उपाध्यक्ष याचे प्रमुख वक्ता होते.

यांच्या व्याखानात शब्दांना आकड्यांची जोड होती, केवळ भारत नव्हे तर इतर देशांचे दाखले देऊन मुद्दा भक्कम पणे समोर येत होता पण श्रोते कदाचित याला योग्य न्याय देऊ शकले नाही कारण संख्या आणि सावधानता दोन्ही कमी झाल्याचे मला जाणवले कदाचित तो माझा व्यक्तिदोष असेल. त्यांनी मांडले –

**'विकसित भारत म्हणजे आर्थिक समृद्धीबरोबरच सामाजिक न्याय, गुणवत्तापूर्ण शिक्षण, आरोग्य, रोजगार**

आपण स्वतःला हवी ती सवय लावू शकतो; फक्त लावायची कोणती हे आपण ठरवायचे असते.

**आणि सर्वसमावेशक विकास.**' भारताला केवळ जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनायचे नाही, तर प्रत्येक नागरिकाच्या जीवनमानात सुधारणा घडवायची आहे. यासाठी मानवसंपदा हेच सर्वात मोठे भांडवल, सोबत शिक्षणाची गुणवत्ता वाढवणे, कौशल्य विकासावर भर, संशोधन आणि नवोपक्रमाला प्रोत्साहन, जागतिक दर्जाच्या विद्यापीठांची निर्मिती देखील आवश्यक राहील आणि या साठी भारताची युवा लोकसंख्या ही सर्वात मोठी ताकद आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर, जैवतंत्रज्ञान, अवकाश तंत्रज्ञान, क्वांटम संगणन सारख्या तंत्रज्ञानाचा भारताने ग्राहक न राहता निर्माता बनले पाहिजे आत्मनिर्भय व्हायला पाहिजे.

''**आत्मनिर्भरता म्हणजे जगापासून वेगळे होणे नव्हे; तर जागतिक पुरवठा साखळीत मजबूत स्थान निर्माण करणे.**''

भारताने उत्पादन, नवकल्पना आणि निर्यात वाढवून जागतिक अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावावी. यासाठी हरित विकास आणि नेट झिरो

अक्षय ऊर्जेचा विस्तार, हरित हायड्रोजन, इलेक्ट्रिक वाहने, कार्बन उत्सर्जन कमी करणे कारण विकसित भारताचा मार्ग पर्यावरणपूरक असलाच पाहिजे. यासोबत ग्रामीण भारताचे परिवर्तन देखील महत्त्वाची बाब राहील यासाठी आधुनिक शेती, कृषी प्रक्रिया उद्योग, डिजिटल ग्रामीण अर्थव्यवस्था, जल व्यवस्थापन कारण भारताचा विकास ग्रामीण भारताच्या प्रगतीशिवाय शक्य नाही. यामध्ये आणखीन महत्त्वाचा मुद्दा होता महिलांचे सक्षमीकरण, त्यांचा रोजगारातील सहभाग वाढवणे. त्यांना उद्योजकता आणि नेतृत्वाच्या संधी उपलब्ध करून देणे कारण भारताच्या विकासाचा वेग महिलांच्या आर्थिक सहभागाशी थेट जोडलेला आहे.

या विकासात मोठा अडथळा आहे भ्रष्टाचाराचा यावर उपाय म्हणजे सुशासन आणि डिजिटल क्रांती, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, पारदर्शक प्रशासन, भ्रष्टाचारात घट, नागरिककेंद्रित सेवा, आधार, UPI, डिजिटल पेमेंट्स यांसारख्या उपक्रमांचा अधिक सक्षम वापर यासाठी भारताची सांस्कृतिक शक्ती 'भारताचे भविष्य केवळ आर्थिक शक्तीत नाही, तर आपल्या संस्कृती, मूल्ये आणि सभ्यतेच्या ज्ञानातही आहे.'

'विकसित भारत सरकार एकटी निर्माण करू शकत नाही. त्यासाठी वैज्ञानिक, शिक्षक, विद्यार्थी, उद्योजक, शेतकरी आणि प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक आहे. २०४७ चा भारत आपण सर्वांनी मिळून घडवायचा आहे.'

या व्याख्यानानंतर जेवण करून सहभागी सदस्याना त्यांच्या त्यांच्या निवासस्थानी पोहोचवण्याची व्यवस्था होती बस नंबर पासून सविस्तर सूचना ग्रुपवर योग्य वेळी येत होत्या.

**दिवस दुसरा :** सकाळी थकवा होता पण होणाऱ्या सत्रानबद्दल उत्सुकता पण होती. अधिवेशन केवळ संघटनात्मक उपदेश देण्या ऐवजी वैचारिक खाद्य पुरवत होते. वेळेवर पोहोचलो. आज प्रवेश मार्गावर असलेले चित्र आणि चित्रकार लक्ष वेधत होते. आम्ही पण काही स्मृती सोबत घेण्यासाठी काही क्लीकस केल्या.




आमच्या विदर्भ प्रांताचे सदस्य एकत्र येऊन काही फोटो काढले.

पहिले सत्र होते खुले. व्याखान डॉ. कृष्ण गोपालजी, (सह संघकार्याचालक) यांचे विज्ञान भारतीच्या ७व्या राष्ट्रीय अधिवेशनात वाराणसी येथे Dr. Krishna Gopal यांनी भारताची वैज्ञानिक परंपरा : प्राचीन ते आधुनिक या विषयावर भाषण केले. त्यांच्या व्याख्यानाचा मला समजलेला सारांश पुढीलप्रमाणे मांडता येईल:



डॉ. कृष्ण गोपाल यांनी सांगितले की, भारताचा वैज्ञानिक इतिहास हा त्याच्या सांस्कृतिक इतिहासा-इतकाच प्राचीन आहे. भारतीय ज्ञानपरंपरेत विज्ञान ही केवळ आधुनिक काळातील संकल्पना नसून हजारो वर्षांपासून जीवनाचा अविभाज्य भाग आहे.

भारतीय परंपरेत विज्ञान आणि अध्यात्म परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत. वैज्ञानिक प्रगती मानवी मूल्यांशी जोडलेली असली पाहिजे. त्यांनी स्पष्ट केले की भारतीय विचारात विज्ञान फक्त प्रयोगशाळांपुरते मर्यादित नाही. संगीत, नृत्य, व्याकरण, आयुर्वेद, गणित आणि तत्त्वज्ञान हे देखील ज्ञान-विज्ञानाचेच विविध आयाम आहेत. भारतीय ज्ञानपरंपरेचे अंतिम उद्दिष्ट केवळ भौतिक प्रगती नसूनः लोककल्याण, पर्यावरण संरक्षण, मानवतेचे हित आणि समाजाचा सर्वांगीण विकास हे आहे, असे त्यांनी अधोरेखित केले. त्यांनी अनेक महान भारतीय वैज्ञानिकांची उदाहरणे दिली: जगदीश चंद्र बोस, रमण, विक्रम साराभाई, अब्दुल कलाम, सतीश धवन यांच्या वैज्ञानिक उपलब्धी बाबत ते जबाबदरीने बोललेच पण त्यांच्या छोट्या छोट्या उदाहरणावरून मानवी मूल्यांची पाठ राखण कशी केली ते देखील विगत केले.

डॉ. कृष्ण गोपाल यांनी विज्ञान भारतीच्या वाराणसी अधिवेशनात भारताच्या प्राचीन वैज्ञानिक परंपरेचा गौरव सांगत विज्ञान आणि अध्यात्म यांचा समन्वय हे भारतीय ज्ञानपरंपरेचे वैशिष्ट्य असल्याचे प्रतिपादन केले. विज्ञानाचे अंतिम ध्येय मानवकल्याण, पर्यावरण संरक्षण आणि राष्ट्रनिर्माण असावे, असे त्यांनी नमूद केले. भारतीय वैज्ञानिकांच्या प्रेरणादायी कार्याचा उल्लेख करून त्यांनी युवकांना भारताचा वैज्ञानिक वारसा अभ्यासण्याचे आणि विकसित भारत २०४७ च्या निर्मितीत योगदान देण्याचे आवाहन केले.

**कृत्रिम बुद्धिमत्ता आणि नैतिकता**

अध्यक्ष - पद्मश्री प्रा. आशुतोष शर्मा

परिचय : माजी सचिव, विज्ञान व तंत्रज्ञान विभाग (DST), माजी अध्यक्ष INSA, पद्मश्री पुरस्कार विजेते वैज्ञानिक. पॅनल चे इतर सदस्य प्रा. मयंक वस्त आयआयटी जोधपूर, श्री. दीपक महेश्वरी वारिष्ट धोरण सल्लागार (सामाजिक आणि आर्थिक प्रगती CSEP) केंद्र डॉ. मनीष सिंग, VP, ML, Bharat Gen, IIT Mumbai मॉडरेटर होते विवेक कुमार सिंग वारिष्ट सल्लागार नीती आयोग या सगळ्यांनी मिळून मांडलेले मुद्दे

सर्वप्रथम नीतीमत्ता आणि ai चा संबंध सांगताना उदाहरण देताना असे दिले - जर मुलाने विचारले मला आई रागावते तर सध्या वापरात असलेली कृत्रिम बुद्धिमत्ता सांगेल 'कोर्टात जा, पोलिकांची मदद घे' कारण हे डोमेस्टिक व्हॉयलंस आहे. (परदेशातील कायद्यानुसार हे नैतिक आहे) पण अजून भारतात कारण विचारल्या जाईल. अर्थात AI विकासात, मानवी मूल्ये केंद्रस्थानी असली पाहिजेत. यामध्ये गोपनीयता, उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि सामाजिक न्याय यांचे पालन

आवश्यक. भारतीय भाषांमध्ये सक्षम AI विकसित करण्याची आवश्यकता.

**भारताने स्वतःची AI नैतिकता चौकट विकसित करावी.**

चर्चेतील निष्कर्ष : – AI हे साधन आहे, पर्याय नाही. तंत्रज्ञानाचा वापर राष्ट्रहित, समाजहित आणि मानवकल्याणासाठी व्हावा. AI च्या वापरासाठी भारतीय सांस्कृतिक मूल्यांवर आधारित धोरण आवश्यक.

यानंतर सुनील आंबेकर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख.

यांचे प्रभावी व्याखान झाले त्यात त्यांनी विज्ञान प्रसारासाठी प्रभावी संवाद आणि समाजसंपर्क आवश्यक. विज्ञानविषयक जनजागृतीमध्ये स्वयंसेवी संस्थांची भूमिका महत्त्वाची आहे. असे विविध उदाहरणे देऊन सांगितले.

विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोपक्रम धोरण (STI Policy)

प्रा. रामनारायण द्विवेदी यांच्या मार्गदर्शनाखाली भारतासाठी विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोपक्रम धोरणाबाबत चर्चा झाली. या चर्चेतून भारतीय परिस्थिती, स्थानिक गरजा, स्वदेशी संशोधन आणि राष्ट्रीय प्राधान्ये यांचा विचार करून धोरणात्मक सूचना केंद्र सरकारकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. पुढील सूचना देण्यासाठी मसुद्याची एक प्रत प्रत्येक सदस्याला पाठवली त्यात सुधारणा करावयाच्या असल्यास योग्य सूचनांचा आदर केला जाईल असे सांगितले.

पुढील धोरणात्मक चर्चा कुठे कशा होतील हे सांगितले, समारोपाच्या आणि जेवणासाठी सभासद अन्नपूर्णा भवनात आमंत्रीले.

**– नीतिन ओक**
जठरपेठ रोड, अकोला
मो.नं.: ९८९०६९८१३९
इ–मेल – okenitin@gmail.com

## वाचकांच्या प्रतिक्रीया

एप्रिल २०२२ चा दिशा अंक वाचला.

दिशामधील संपादकीय लेख खूप आवडला. विज्ञान म्हणजे काय ? या प्रश्नाचे सविस्तर उत्तर मिळाले. विज्ञान प्रसारक हा वैज्ञानिक आणि सामान्य जनता या मधील दुवा असतो, म्हणून विज्ञान प्रसारक हा निरंतर विज्ञान अभ्यास करणारा आणि अभिनव प्रयोग दिग्दर्शनात पारंगत असावा लागतो हे अनेक उदाहरणे देऊन पटवून देण्यात संपादक यशस्वी ठरले आहेत. मी स्वतः विज्ञान प्रसारक आहे. माझ्यासाठी संपादकीय लेख मोलाचा आहे! त्यासाठी संपादकांचे कितीही आभार मानले तरी थोडेच आहे !

तसेच डॉ. मल्होत्रा यांचे अणूऊर्जा प्रकल्पासंदर्भात लोकांचा विरोध युक्तीने काढण्याची संकल्पना आवडली. तुषार दामगुडे यांचा हिंदूत्व समजून घेताना हा लेख हिंदूना मार्गदर्शक ठरणार यात शंका नाही! तुषारजींचा लेख तमाम हिंदू बंधू–भगिनींना सकारात्मक विचार करायला लावेल हे निश्चित.

**– सिद्धेश्वर म्हेत्रे**
राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक

•••

# परिसर वार्ता

– संकलित

## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

### नीट परीक्षा २०२६

नीट परीक्षा दिनांक ३ मे २०२६ रोजी पार पडली. २८८ विद्यार्थीसाठी वि.प्र.मं चे विधी महाविद्यालय केंद्र होते. सदर परीक्षेचे केंद्रप्रमुख डॉ. श्रीविद्या जयाकुमार व उपकेंद्रप्रमुख प्रा. विनोद एच. वाघ होते.

### वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

दि. ९ मे २०२६ रोजी महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात व विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागासह आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. नागेश लोहार उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल गुणवत्तापत्रके, पदके आणि चषक प्रदान करून सन्मानित करण्यात आले. यामध्ये उत्कृष्ट शिस्तबद्ध विद्यार्थी, उत्कृष्ट वाचक, फ्रेशर्स मूट कोर्ट, वादविवाद स्पर्धा, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम तसेच संपूर्ण शैक्षणिक वर्षभर आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धा व उपक्रमांतील यशस्वी विद्यार्थ्यांचा समावेश होता. प्रमुख पाहुणे श्री. नागेश लोहार यांच्या हस्ते प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार आणि उपप्राचार्य डॉ. विनोद एच. वाघ यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापिका सौ. हेतल मैशेरी यांनी केले. आपल्या उद्घाटनपर भाषणात श्री. नागेश लोहार यांनी पोलिस विभागाच्या पदानुक्रमाविषयी मौल्यवान मार्गदर्शन केले. तसेच पोलिस दलातील विविध पदांचे कार्य व जबाबदाऱ्या यांविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन सहाय्यक प्राध्यापक श्री. यतीन पंडित यांनी केले. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. त्यामुळे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ हा सर्वांसाठी प्रेरणादायी, संस्मरणीय आणि यशस्वी ठरला.



**ॲड ऑन अभ्यासक्रम निवडणूक कायदा इलेक्शन लॉ परीक्षा १६ मे २०२६ रोजी घेण्यात आली.**

### विधी महाविद्यालयाचा अभिनव उपक्रम; AIBE विशेष मार्गदर्शन मालिकेला उत्स्फूर्त प्रतिसाद

महाविद्यालयाच्या आंतरिक गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) च्या पुढाकाराने प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या ऑल इंडिया बार एक्झामिनेशन (AIBE) विशेष मार्गदर्शन मालिकेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महाविद्यालयाच्या इतिहासात प्रथमच

राबविण्यात आलेल्या या उपक्रमात महाराष्ट्रातील विविध भागांतील ५१ विद्यार्थ्यांनी नोंदणी करून सहभाग घेतला.

AIBE परीक्षेसाठी दर्जेदार व संरचित मार्गदर्शन विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याची संकल्पना महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी मांडली. विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक प्रगतीसाठी आणि बार कौन्सिलच्या परीक्षेत यश मिळविण्यासाठी अशा विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाच्या IQAC ने या उपक्रमाचे नियोजन केले आणि पहिल्याच वर्षी हा उपक्रम यशस्वी ठरला.

या संपूर्ण उपक्रमाचे समन्वयन महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. विनोद एच. वाघ यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन, तज्ज्ञ प्राध्यापकांशी समन्वय, वेळापत्रक आखणी, विद्यार्थ्यांची नोंदणी, ऑनलाईन सत्रांचे व्यवस्थापन, तसेच संपूर्ण अंमलबजावणी यांची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे पार पाडली.

१६ मे ते ६ जून २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या विशेष प्रशिक्षण मालिकेत १९ विषयांचे अध्यापन अनुभवी विधिज्ञ, न्यायिक अधिकारी व प्राध्यापकांनी केले. सर्व सत्रे ऑनलाईन माध्यमातून सायंकाळी घेण्यात आली असून, इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

मार्गदर्शनासाठी ॲड. गजानन चव्हाण (माजी अध्यक्ष, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा), ॲड. सुनील परांजपे (वरिष्ठ वकील, उच्च न्यायालय), ॲड. डॉ. मिथुन बनसोडे, ॲड. डॉ. गोपीचंद खाडे, ॲड. संजय भाटे (माजी जिल्हा व सत्र न्यायाधीश), डेटा ॲनालिस्ट श्री. संदेश जाधव (सायबर कायदा तज्ज्ञ) आणि ॲड. योगेंद्र पेंडसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याशिवाय प्रा. हेतल मिशेरी, श्रीमती कृष्णा कामथ, डॉ. रुपाली जामोदे आणि ॲड. समता जोशी यांनीही विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षणामध्ये व्यावसायिक नीतिमत्ता व व्यावसायिक गैरवर्तन, घटनात्मक कायदा, जनहित याचिका, प्रशासकीय कायदा, दिवाणी प्रक्रिया संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, भारतीय साक्ष्य अधिनियम, करार कायदा, विशिष्ट दिलासा कायदा, मालमत्ता कायदे, निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्ट, भारतीय न्याय संहिता, सायबर कायदा, पर्यावरण कायदा, पर्यायी विवाद निवारण, कौटुंबिक कायदा, जमीन अधिग्रहण, बौद्धिक संपदा कायदा, कंपनी कायदा, कर विषयक कायदे, तसेच कामगार व औद्योगिक कायदे यांसह AIBE अभ्यासक्रमातील सर्व महत्त्वाच्या विषयांचा समावेश करण्यात आला होता.

विद्यार्थ्यांच्या स्व-अभ्यासासाठी स्वतंत्र दिवस राखून ठेवण्यात आले होते. तसेच ५ जून रोजी ऑनलाइन सराव परीक्षा (Mock Test) घेऊन विद्यार्थ्यांच्या तयारीचे मूल्यमापन करण्यात आले. एकूण सुमारे ३० तासांचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आले.

महाविद्यालयाच्या IQAC तर्फे राबविण्यात आलेला हा पहिलाच AIBE मार्गदर्शन उपक्रम असून, पहिल्याच वर्षी मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. राज्यभरातील विधी पदवीधरांना परीक्षेपूर्वी गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला आहे. यावेळी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक यशासाठी अशा कौशल्याधिष्ठित व परीक्षा-केंद्रित उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली. तर कार्यक्रमाचे

समन्वयक डॉ. विनोद एच. वाघ यांनी या उपक्रमाच्या यशामागे विद्या प्रसारक मंडळाचा पाठिंबा, संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांचे मार्गदर्शन, प्राचार्यांचे दूरदर्शी नेतृत्व, IQAC चे प्रभावी नियोजन आणि सर्व तज्ज्ञ मार्गदर्शकांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे नमूद केले. महाविद्यालय प्रशासनाने हा उपक्रम आगामी वर्षांमध्ये अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याचा निर्धार व्यक्त केला असून AIBE परीक्षेच्या तयारीसाठी ठाणे विधी महाविद्यालयचा हा उपक्रम राज्यातील विधी शिक्षण क्षेत्रात एक आदर्श उपक्रम ठरत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.



**Faculty Induction Programme : १८ मे २०२६**

महाविद्यालयाच्या ठाणे येथील सहाय्यक प्राध्यापिका सौ. चदणी विश्वासराव घोगरे यांनी दिनांक १८ मे २०२६ ते १३ जून २०२६ या कालावधीत मुंबई विद्यापीठाच्या यूजीसी मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र (MMTTC) यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच व्ही. के. कृष्ण मेनन महाविद्यालय, भांडूप, मुंबई यांच्या आयोजनाखाली आयोजित Faculty Induction Programme मध्ये सहभाग नोंदविला.

**महाविद्यालयातील विद्यार्थांना दि. २२ मे २०२६ पासून उन्हाळी सुट्टी आहे.**


**सत्र III चा निकाल ९ मे रोजी जाहीर झाला.**

**सहाय्यक प्राध्यापिका सौ. हेतल मेशेरी यांचा आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकात संशोधन लेख प्रकाशित**

विषय : ''महिलांच्या संरक्षणापासून लिंगसमावेशकतेकडे : महिला व ट्रान्सजेंडर व्यक्तींसाठी POSH कायद्याचे पुनर्व्याख्यान'' हा संशोधन लेख आयुषी इंटरडिसिप्लिनरी रिसर्च जर्नल (Ayushi International Interdisciplinary Research Journal) मध्ये प्रकाशित झाला आहे. हे नियतकालिक पीअर–रिव्ह्यूड (Peer Reviewed) असून त्याचा इम्पॅक्ट फॅक्टर 8.58 आहे. ISSN क्रमांक : 2349-368X.

**मोहम्मदन कायदा पुस्तक प्रकाशन :**


महाविद्यालयाच्या सहाय्यक प्राध्यापिका हेतल मेशेरी यांनी तीन वर्षांच्या विधी अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या सत्रासाठी अनिवार्य असलेल्या 'मोहम्मदन कायदा' या विषयावर एक पुस्तक लिहिले आहे. प्रा. हेतल मेशेरी या २२ वर्षांहून अधिक काळ विद्या प्रसारक मंडळाच्या परिवाराशी संबंधित असून, त्या याच संस्थेच्या एक अभिमानास्पद माजी विद्यार्थिनी देखील आहेत. कायद्याच्या या महत्त्वाच्या क्षेत्रात त्यांनी विद्वत्तापूर्ण योगदान दिले आहे, ही महाविद्यालयासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे; या विषयावर केवळ काही मोजक्याच शिक्षणतज्ज्ञांनी पुस्तके लिहिली आहेत. या उल्लेखनीय कामगिरीचा सन्मान करण्यासाठी, प्रथम वर्षाच्या एलएल.बी.च्या विद्यार्थ्यांनी शाल आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला. व्हीपीएम परिवाराच्या वतीने, उपप्राचार्य डॉ. विनोद एच. वाघ यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.






## विद्या प्रसारक मंडळाचे अभियांत्रिकी महाविद्यालय

महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशनच्या विभाग प्रमुख डॉ. कीर्ती आगाशे दिनांक ३०/५/२६ ला निवृत झाल्या. डॉ. कीर्ती आगाशे १९९० पासून कार्यरत होत्या. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबवले. त्यांचे संगीतातील आणि लेखनातील कौशल्य उल्लेखनीय होते. विद्या प्रसारक मंडळाच्या अभियांत्रिकी परिवारातर्फे त्यांना अनेक शुभेच्छा.



## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

२ मे २०२६ : सहाय्यक प्राध्यापक कीर्ती दिवेकर यांनी एआयसीटीई (AICTE) आणि शिक्षण मंत्रालयाच्या 'इनोव्हेशन म्बेसेडर (IA) – फाउंडेशन लेव्हल' या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण पूर्ण केले.




३ मे २०२६ : डॉ. विभूती सावे यांनी ए बी डी सी : A; आणि स्कोपस – Q1 अनुक्रमित नियतकालिक 'जर्नल ऑफ रिटेलिंग अँड कंझ्युमर सर्व्हिसेस' साठी एआय-इनेबल्ड रिटेलिंग, बिग डेटा नालिटिक्स, कंझ्युमर ट्रस्ट आणि कंझ्युमर लॉयल्टी या क्षेत्रातील एका संशोधन हस्तलिखिताचे समीक्षण केले.




४ मे २०२६ : पीएचडी प्रवेश क्षमता वाढवण्यासाठीच्या एलआयसी समितीचे संयोजक म्हणून डॉ. नीतिन जोशी यांनी कल्याणच्या साकेत इन्स्टिट्यूटला भेट दिली.

९ मे २०२६ : महाराणा प्रताप जयंतीनिमित्त आयोजित

फक्त संघर्षाच्या काळातच एकटं राहावं लागतं, बाकी चांगल्या काळात सर्वच सोबत असतात!

१० किमी व्हर्च्युअल रन यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल श्री. संजय सपकाळ यांना गौरव प्रमाणपत्र आणि पदक प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमात सहभागी होणे हा एक अद्भुत अनुभव होता, यामुळे केवळ शारीरिक तंदुरुस्तीलाच प्रोत्साहन दिले नाही, तर आरोग्य, तंदुरुस्ती आणि दृढनिश्चयाला प्रोत्साहन देताना मेवाडचे राजपूत राजे महाराणा प्रताप यांच्या शौर्य, पराक्रम आणि वारशाला आदरांजली वाहिली.






१० मे २०२६ : मातृदिनानिमित्त श्री. संजय सपकाळ यांनी ११ किलोमीटरची व्हर्च्युअल रन यशस्वीरित्या पूर्ण केली. या यशामुळे मला अशा अर्थपूर्ण कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन निरोगी आणि सक्रिय जीवनशैली जपण्यासाठी प्रेरणा मिळाली असे मत त्यांनी व्यक्त केले.






११ मे २०२६ : ब्रिम्सच्या संशोधन केंद्रातील पीएचडी जागांची प्रवेश क्षमता वाढवण्यासाठी, मुंबई विद्यापीठाच्या एलआयसी (LIC) समितीने ब्रिम्स (BRIMS) कॅम्पसला भेट दिली.

११ मे २०२६ : सहाय्यक प्रा. कीर्ती दिवेकर यांनी ठाणे जनता सहकारी बँकेच्या, मुंबई आणि ठाणे येथील शाखांतील मध्यम व्यवस्थापन संघ प्रतिनिधींसाठी व्यवस्थापन विकास कार्यक्रम (MDP) आयोजित केला. 'ड्रायव्हिंग ब्रँच एक्सलन्स: ए गाइड टू कम्युनिकेशन अँड एक्सलन्स,' हा कार्यक्रम प्रभावी संवाद कौशल्य विकसित करणे, व्यावसायिक परस्परसंवाद वाढवणे, सांघिक कार्यक्षमता वाढवणे आणि बँकिंग वातावरणात सेवा उत्कृष्टतेची संस्कृती निर्माण करण्यावर केंद्रित आहे.



१२ मे २०२६ : डॉ. नीतिन जोशी यांनी टीजेएसबी च्या व्यवस्थापकांसाठी 'ग्राहकांना समजून घेणे' या विषयावर एक दिवसीय व्यवस्थापकीय विकास कार्यक्रम (एमडीपी) आयोजित केला.

१६ मे २०२६ : पॉवर बीआय आणि ॲडव्हान्स्ड एक्सेल प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा शुभारंभ

डॉ. व्ही. एन. ब्रिम्स, ठाणे यांनी, जोशो लर्निंग अँड डेव्हलपमेंटच्या सहकार्याने, विद्यार्थी आणि व्यावसायिकांमधील डेटा नालिटिक्स, बिझनेस इंटेलिजन्स आणि निर्णयक्षमता कौशल्ये वाढवण्यासाठी पॉवर बीआय आणि ॲडव्हान्स्ड एक्सेल प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केला आहे.

हा ३० तासांचा ब्लेंडेड प्रोग्राम ॲडव्हान्स्ड एक्सेल, पॉवर बीआय, डेटा व्हिज्युअलायझेशन, डॅशबोर्ड डेव्हलपमेंट आणि बिझनेस नालिटिक्समध्ये प्रात्यक्षिक प्रशिक्षण देतो, ज्यामुळे डॉ. व्हीएन ब्रिम्स आणि जोशो लर्निंग अँड डेव्हलपमेंट यांच्याकडून संयुक्त प्रमाणपत्र प्रदान केले जाते.

सुरुवात कशी झाली यावर बऱ्याच घटनांचा शेवट अवलंबून असतो!

अभ्यासक्रम समन्वयक: डॉ. पल्लवी चंदवास्कर आणि डॉ. विभूती सावे.




१७ मे २०२६ : डॉ. पल्लवी चंदवास्कर यांनी आयुष योग नियंत्रण मंडळाच्या वायपीआय शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी 'पतंजली योगसूत्र: बहिरंग आणि अंतरंग योग' या विषयावर भारत, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया येथील सहभागींसह आंतरराष्ट्रीय शिक्षकांच्या तुकडीचे ऑनलाइन पद्धतीने प्रशिक्षण सत्र घेतले.

१७ मे २०२६ : सहाय्यक प्राध्यापक सिद्धेश सोमण यांना बीएसई इंटरनॅशनल कन्व्हेन्शन हॉल येथे आयोजित नॅशनल झिरोधा व्हर्सिटी कॉर्पोरेट क्विझच्या महाअंतिम सोहळ्यात पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले. त्यांनी झिरोधा व्हर्सिटीचे प्रमुख श्री. कार्तिक रंगप्पा यांच्याशी ब्रिम्स् सोबतची भागीदारी अधिक दृढ करण्यासंदर्भात संवाद साधला.







१८ मे २०२६ : सहाय्यक प्राध्यापक कीर्ती दिवेकर यांचा 'आयटी कंपन्यांमधील भरती आणि निवड प्रक्रियेवर कृत्रिम बुद्धिमत्तेच्या परिणामकारकतेचा अभ्यास' या शीर्षकाचा शोधनिबंध 'जर्नल ऑफ एशिया एंटरप्रेनिरशिप अँड ससस्टेनेबिलिटी' या 'एबीडीसी – सी अनुक्रमित नियतकालिका' मध्ये प्रकाशित झाला.





२१ मे २०२६ : सहाय्यक प्राध्यापक कीर्ती दिवेकर यांचा 'ऍनालीटीकल स्टडी ऑफ ईएसजी डिस्क्लोजर ट्रेंड इन ऑटोमोबाईल अँड आयटी कंपनीज' या शीर्षकाचा

शोधनिबंध ॲडव्हान्सेस इन कंझुमर रिसर्च' या 'एबीडीसी – बी अनुक्रमित नियतकालिका' मध्ये प्रकाशित झाला.




२१ मे २०२६ : उद्योग क्षेत्रा सोबत निकट सहकार्य करण्याच्या उद्देशाने ब्रिम्सने तीन वर्षांसाठी 'ठाणे लघु उद्योग संघटना' (TISSA) या संस्थेचे सदस्यत्व घेतले.

२१ मे २०२६ : डॉ. पल्लवी चंदवास्कर आणि डॉ. मयुरा पाटील यांनी लिहिलेले 'फंडामेंटल्स ॲंड ॲप्लिकेशन्स ऑफ मार्केटिंग' नावाचे (आयएसबीएन क्रमांक ९७८९३४९२२४१४) व मुंबई विद्यापीठाच्या नवीन एमएमएस सत्र १ आणि २ च्या अभ्यासक्रमासाठी उपयोगी असे, पुस्तक, आर्चर्स ॲंड एलिव्हेटर्स पब्लिशिंग हाऊस, बंगळूर यांनी प्रकाशित केले.







२९ मे २०२६ : शिक्षण क्षेत्रात तसेच एकंदरीत समाजात दिलेल्या मोलाच्या योगदानाबद्दल कोटक लाईफ इन्शुरन्स लि. तर्फे ब्रिम्सच्या प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला.





•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❈ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❈ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❈ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❈ संपर्क ❈**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

Email : vpmt1935@gmail.com


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे–४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.